# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## इंजिनिअरिंग प्रवेशावेळी अतिरिक्त शुल्क आकारल्यास संस्थेवर होणार कारवाई

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- राज्यातील काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थी आणि पालकांची अतिरिक्त फी, किंवा इतर फीच्या नावाखाली पिळकवणूक होत असते. गेल्या काही दिवसांपूर्वी पुण्यातील इंजिनिअरींगच्या कॉलेजकडून तशी शैक्षणिक फी शिवाय अधिकची रक्कम आकारली जात असल्याचे काही व्हिडिओ सोशल मीडियातून समोर आल होते. तर, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थी, व पालकांनीही तक्रारी केल्या आहेत. त्याच, पार्श्वभूमीवर मंजूर नसलेले नियमबाह्य शुल्क आकारताना आढळल्यास, संबंधित संस्थेवर कडक कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे शुल्क नियामक प्राधिकरणाने म्हटले आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांचे पालक आणि काही लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने अनेक संस्था अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून अवाजवी नियमबाह्य शुल्क आकारत आहेत. पालकांनी आपल्या तक्रारी इंजिनिअरींग कॉलेजकडून रोख स्वरुपात किंवा इतर कारणास्तव अवाजवी पैशांची मागणी केली जात असल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. त्यानंतर, सीईटी सेलने संबंधित तक्रारींची दखल घेत महाविद्यालयांना कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिलाय.


(वर्ष ६५ वे अंक २२८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.१० सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# सण-उत्सवाच्या काळात मनोज जरांगेंनी आंदोलन स्थगित करावे

## प्रसाद लाड आणि उदय सामंत यांची विनंती

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज १२ दिवस असून सरकारने त्यांच्या १२ मागण्या मान्य केल्याचं मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितलं होतं. मात्र, सरकारने एकही मागणी मान्य केली नसल्याचं सांगत जरांगे पाटलांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. त्याच पार्श्वभूमीवर आता सरकाराच्यावतीने मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारची बाजू मांडली. तसेच, जरांगे पाटलांच्या भाषेवरुन, जसे त्यांचे समर्थक तसे आमच्या नेत्यांचेही समर्थक असल्याचे सामंत यांनी म्हटले.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या आदेशाने मी आणि प्रसाद लाड, आम्ही छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रशासन, तथा आरक्षण समितीची बैठक घेतली. आत्तापर्यंत मराठा समाजासाठी जे काही काम केले त्यासाठी या बैठक होत्या. मराठवाड्यात २१ हजार ५१ जात प्रमाणपत्र दाखले पडताळणी केली असून त्यातील १६,११० दाखले दिले आहेत. त्यामुळे, पडताळणी चुकीची होतेय हा गैरसमज आहे, असे उदय सामंत यांनी म्हटले. तसेच, फक्त २ हजार दाखले प्रलंबित आहेत, तेही लवकरच मिळतील. त्याचा ओबीसी समाजावर काहीही परिणाम होणार नाही, सरकारची भूमिका स्पष्ट आहे, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

आम्ही कुणालाही दुजाभाव वागणूक दिली नाही, सरकार म्हणून आम्ही सोबत आहोत, अधिकारी काम करत आहेत. मनोज दादा खुश राहावे तसे एकनाथ शिंदेही आनंदी राहावे, फडणवीस साहेब ही आनंदी राहावे, मनोज दादाचे अनेक फॉलोअर्स आहेत. त्यामुळे, ज्या नेत्यांनी काम केले त्या नेत्यांबद्दल वाईट बोलले तर वाईट वाटते, असे म्हणत उदय सामंत यांनी जरांगे पाटलांकडून एकनाथ शिंदेंचा एकेरी उल्लेख करण्यात आल्यावरुन मत मांडले. तसेच, जाणीवपूर्वक कुणीतरी त्यांच्यात गैरसमज करतंय, असे उदय सामंत यांनी म्हटले.

संवाद गरजेचा आहे, आणि आमच्या नेतृत्वाला वाईट बोलू नये हे आम्ही संयमाने सांगतो. मनोज जरांगे पाटील यांना गैररसमज नाही, त्यांना कुणीतरी सांगतं आणि नंतर होतो असे आम्हाला वाटते. उद्या पोळा सण आहे, मराठवाड्यात दुष्काळ आहे, राज्यात गणेशोत्सव आहे. त्यामुळे, आंदोलनाला स्थगिती द्यावी ही विनंती आहे, असेही सामंत यांनी म्हटले. जरांगे पाटील आक्रमक आहेत तर आम्ही सरकार आहोत, मायबाप आहोत, संयम आमच्या पाचवीला पुजला आहे. आम्हला संयमीच बोलावे लागेल. आम्ही त्यांना अभ्यासक पाठवा आवाहन केले, आता ते आले नाही तर काय करावे, असा सवालही सामंत यांनी विचारला.

## एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांच्या अंगावर मराठे घालण्याचे पाप करू नये-मनोज जरांगे

### छत्रपती संभाजीनगरच्या बैठकीत षड्यंत्र रचले असल्याचा आरोप

जालना दि.९ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या अंमल बजावणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या बेमुदत उपोषणाचा आज, बुधवारी (दि.९) बारावा दिवस आहे. उपोषणामुळे शारीरिक स्थिती अधिकच खालावल्याने बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार जरांगे पाटील यांना पुन्हा सलाईन लावून उपचार सुरू करण्यात आले. उपचार सुरू असतानाच घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या शासकीय बैठकीवर घणाघाती आरोप केले. 'संभाजीनगरच्या बैठकीत केवळ आमचे आंदोलन मोडीत काढण्याचे नियोजन आणि षड्यंत्र रचले गेले. तुम्ही सपशेल अपयशी ठरला आहात; हे सरकार आरक्षण देऊ शकत नाही हे एकदा स्पष्ट सांगा,' अशा अत्यंत आक्रमक शब्दांत जरांगे यांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले.

उद्योगमंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी घेतलेल्या बैठकीचा समाचार घेताना जरांगे म्हणाले, 'मागण्या मान्य झाल्याचे सांगून बैठकांचे केवळ देखावे केले जात आहेत. मी दोन महिन्यांपासून जात प्रमाणपत्रे देण्याची मागणी करत आहे. रद्द झालेली चार प्रमाणपत्रे वैध करून देतो म्हणाले होते, त्याचे काय झाले? हैदराबाद गॅझेटच्या अधिकृत अंमल बजावणीचे काय झाले? आरक्षण आणि जात पडताळणीबाबत सरकार काहीच बोलायला तयार नाही. आम्ही सण-उत्सव पाहत नाही, तुम्ही थेट कामाचे बोला.' मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गोड बोलून मराठ्यांचा घात केल्याचा पुनरुच्चार त्यांनी



केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री संजय शिरसाट यांच्यावर थेट तोफ डागत जरांगे म्हणाले, 'मराठ्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याचे काम शिंदे आणि शिरसाट यांनी ठरवून केले आहे. छत्रपती संभाजीनगरात बसून दंगल घडवण्याचे नियोजन सुरू आहे का? एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांच्या अंगावर मराठे घालण्याचे पाप करू नये, अन्यथा या सगळ्याला केवळ शिंदेच जबाबदार राहतील. तुमच्या अंगावरचे ओरखडे अजून बुजलेले नाहीत, वेळीच शहाणे व्हा.' आपण तीन वर्षे एकनाथ शिंदे यांच्याशी गोड बोललो, हे सत्ताधारी का सांगत नाहीत, असा सवालही त्यांनी केला.

आंदोलनाच्या पुढील दिशेबाबत राज्य सरकारला अंतिम इशारा देताना जरांगे म्हणाले, 'आम्ही १२ सप्टेंबरपर्यंत सरकारला वेळ देत आहोत. या मुदतीत सरकारने प्रश्न सोडवला नाही, तर १२ तारखेनंतर आमचा मुंबईत येण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा आहे. आम्ही शांततेच्या मार्गाने मुंबईत येऊ आणि हक्काचे आरक्षण घेऊनच राहू.' 'काही नेते गुंडगिरीच्या जोरावर आम्हाला धमकावत आहेत. मराठ्यांसाठी मरण आले तरी चालेल, आम्ही कोणाच्याही दबावाला घाबरत नाही. आंदोलनातून माघार घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.'

आपल्या भाषेवरून मंत्र्यांकडून दिल्या जाणाऱ्या सल्ल्यावर संताप व्यक्त करत जरांगे म्हणाले, 'आता जरांगे यांची भाषा हे केवळ पळवाटा काढण्याचे निमित्त केले जात आहे. हे रडके लोक खरे सांगायला तयार नाहीत. मी जातवान कुणबी आहे. मराठा आणि ओबीसी या दोन्ही घटकांना समोरासमोर उभे करून सत्तेची पोळी भाजण्याचे काम राज्यकर्त्यांनी केले आहे.' उदय सामंत आणि प्रसाद लाड यांच्या एका शब्दावर आपण सलाईन लावून उपचार सुरू केले, मात्र मागण्यांवर ठोस निर्णय झाल्याशिवाय उपोषण स्थगित होणार नाही, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

जरांगे पाटलांनी प्रताप सरनाईक यांना लक्ष्य करत म्हटले की, तुम्ही रड्याची भाषा केली त्याला रट्टानेच उत्तर मिळेल, असे त्यांनी म्हटले. प्रताप सरनाईक तुमचे फडणवीस बद्दल काय मत आहे सर्वांना माहिती, यांना वाटत मी महाविकास आघाडीला (पान ४ वर)

## राज्यात १५ ऑक्टोबरपासून गाळप हंगामाचा श्रीगणेशा

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- राज्यातील सन २०२६-२७ च्या आगामी ऊस गाळप हंगामाचे धोरण निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत यंदाचा गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्यास अधिकृत मान्यता देण्यात आली. तसेच, शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हिताचा समतोल साधत साखर कारखान्यांना दिलासा देणारे अनेक मोठे निर्णय या बैठकीत घेण्यात आले.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत ऊस उपलब्धता, गाळपाचे नियोजन, एफआरपी आणि कारखान्यांसमोरील तांत्रिक अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी बैठकीत विविध योजनांचे सादरीकरण केले. ज्या साखर कारखान्यांचे सहवीज निर्मिती प्रकल्पांशी संबंधित वीज खरेदी करार संपुष्टात आले आहेत, त्यांना २०२३-२४ च्या हंगामाप्रमाणेच प्रति युनिट १.५० रुपये सबसिडी देण्याचा मोठा निर्णय सरकारने घेतला आहे. याशिवाय, थकीत देणी देण्यासाठी सॉफ्ट लोनवर व्याज अनुदान सुरू करणे, साखर पॅकिंगसाठी ज्युट बॅगची सक्ती शिथिल करणे आणि सीबीजी निर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सुधारित ऊस वाण, ठिबक सिंचन आणि खतांच्या संतुलित वापरासाठी विशेष ऊस विकास योजना लागू केली जाणार आहे.

## 'महाभूमी स्टॅक' ॲपवर मिळणार जमिनीचा जुना इतिहास ते रेडी रेकनरच्या दराची माहिती

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- राज्यातील जमिनीच्या खरेदी-विक्री आणि इतर सर्व व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने 'महाभूमी स्टॅक' नावाचे एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार (ॲप) विकसित केले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकार परिषदेत या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली. याचबरोबर, राज्यातील आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्टे आणि जमिनीचे मालकी हक्क देण्यासाठी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान एक विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बावनकुळे यांनी सांगितले की, 'आम्ही महाभूमी स्टॅक ॲप डेव्हलप केले आहे. यामध्ये विखुरलेल्या विविध प्रणालींचे एकत्रीकरण करून १० प्रमुख भूमी सेवांसाठी ही एकच प्रणाली तयार करण्यात आली आहे. तब्बल ३६ कोटी जुने दस्तऐवज स्कॅन करण्यात आले आहेत.' या प्रणालीमुळे दीड कोटी भू-नकाशे, ४० कोटी जुने फेरफार आणि नोंदणी दस्त एकाच (पान ४ वर)

## कोरडा दुष्काळ जाहीर करा, सरसकट कर्जमाफी द्या; रविकांत तुपकरांचा सरकारला इशारा

अमरावती दि.९ (प्रतिनिधी)- पावसाने दडी मारल्यामुळे राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी आक्रमक भूमिका घेत राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ''राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी,'' या प्रमुख मागणीसह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तुपकर यांच्या नेतृत्वाखाली आज अमरावती विभागीय कार्यालयावर डेरा आंदोलन करण्यात आले.

आंदोलनापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत रविकांत तुपकर यांनी सरकारला खडे बोल सुनावले. ''पावसाचा खंड पडल्यामुळे सोयाबीन, कपाशी आणि मूग ही पिके शेतकऱ्यांच्या हातून गेली आहेत. एका बाजूला सरकार मारतय आणि दुसऱ्या बाजूला निसर्ग मारतोय, अशी विदर्भातली परिस्थिती आहे. छत्रपती शिवरायांच्या काळात दुष्काळ पडला तेव्हा त्यांनी अन्नधान्याची कोठारे खुली करून शेतकऱ्यांना जगवले. मात्र, त्यांचे नाव घेऊन चालणारे हे महायुती सरकार शेतकऱ्यांना एक रुपयाचीही मदत करायला तयार नाही,'' अशी बोचरी टीका त्यांनी केली.

''सत्ताधारी लोक मोठ्या रॅली आणि कार्यक्रम करतात तेव्हा त्यांच्यावर कारवाई होत नाही, पण शेतकरी रस्त्यावर आला की त्याला जेलमध्ये टाकले जाते. इंग्रजांपेक्षाही हे सरकार भयानक वागत आहे. जर आमच्या बापाचा घाम तुम्ही पायाखाली तुडवाल, तर तुमच्या राजकीय गढ्या उद्ध्वस्त केल्याशिवाय आम्ही राहणार नाही,'' असा सणसणीत इशारा तुपकर यांनी दिला. पंजाबच्या धर्तीवर महाराष्ट्रातही शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे आंदोलन उभारणार असल्याचे ते म्हणाले.

साखरेची कृत्रिम टंचाई निर्माण करून विशिष्ट व्यापाऱ्यांचा फायदा करून दिला जात असल्याचा आरोप (पान ४ वर)

## जरांगे यांच्या आरोग्याच्या निगराणीसाठी २४ तास वैद्यकीय पथक कार्यरत

जालना दि.९ (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट २०२६ पासून अंतरवाली सराटी येथे अन्न व पाण्याविना उपोषण करीत आहेत. त्यांच्या आरोग्य तपासणी व उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील वैद्यकीय पथके २४ तास कार्यरत आहेत. काल जरांगे पाटील यांना सात सलाईन लावण्यात आल्या. आज दुपारीही त्यांची तपासणी करण्यात आली असून त्यांना एक सलाईन लावण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली आहे.

वैद्यकीय पथकाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७.३५ वाजता त्यांची वैद्यकिय तपासणी केली. यावेळी त्यांची प्रकृती सर्वसाधारण मध्यम स्वरूपाची असल्याचे आढळले. त्यांना ८ सप्टेंबर रोजी सात बाटल्या आयव्ही फ्ल्यूड सलाईन देण्यात आले. तसेच आज दुपारीही जरांगे यांच्या प्रकृतीची तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांना १ सलाईन लावण्यात आली असून आता त्यांची प्रकृती स्थिर आहे. उपोषणाचा बारावा दिवस असल्याने संभाव्य आरोग्यविषयक धोके जरांगे यांना समजावून सांगण्यात आले आहेत. तथापि, त्यांनी रुग्णालयात दाखल होण्यास संमती दिलेली नसल्याचे जिल्हा रुग्णालयाने कळविले आहे.

## राज्यात पावसाची १६ टक्के तूट, ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान विदर्भ-मराठवाड्यात पावसाची शक्यता, हवामान खात्याचा अंदाज

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. त्यात आता राज्यात पावसाची तब्बल १६ टक्के तूट झाली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याचे चित्र आहे. या भागांमध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात तर जवळपास ७० टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे.

दरम्यान, ११ सप्टेंबर ते १४ सप्टेंबरदरम्यान पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात काही भागांमध्ये पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी विशिष्ट प्रकारचे आणि योग्य स्थितीतील ढग असणे आवश्यक असते. मात्र, कृत्रिम पावसाचा प्रयोग केला तरी त्यातून नेमका किती पाऊस पडेल, हे निश्चितपणे सांगता येत नाही. आतापर्यंतची पावसाची परिस्थिती पाहता शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. उभी पिके करपली असून अनेक ठिकाणी फळझाडांनाही मोठा फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा काटकसरीने आणि जपून वापर करणे गरजेचे आहे.

मराठवाड्यात मागील ४५ दिवसांपासून पावसाचा थेंबही न पडल्याने दुष्काळाची छाया अधिक गडद झाली आहे. हिंगोली जिल्ह्यात तर परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, हजारो रुपये खर्च करून दिवस-रात्र मेहनत करून उभं केलेलं सोयाबीन पीक आता शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर मातीमोल होत आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील बेरुळा येथील शेतकरी अमृता चव्हाण यांनी तब्बल सात एकर क्षेत्रात सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र पावसाअभावी पीक करपून गेलं. उत्पादनाची कोणतीही शक्यता उरली नाही आणि अखेर नाईलाजाने अमृता चव्हाण यांनी उभ्या सोयाबीन पिकावर रोटावेटर फिरवत पीक नष्ट केलं. ज्या पिकातून चार पैसे हातात पडतील कुटुंबाचा संसार चालेल, अशी आशा होती. त्याच पिकावर आता रोटावेटर फिरवण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. हिंगोली जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची अशीच अवस्था झाली असून, पावसाअभावी उभी पिकं करपली आहेत. शेतकऱ्यांसमोर आता उत्पादनाचा प्रश्न तर आहेच, पण केलेला खर्चही वसूल होणार का, हा मोठा सवाल उभा राहिला आहे.

## अमरावती रुग्णालयातील ३ बालकांच्या मृत्यूप्रकरणी समितीचा अहवाल सादर; अधिकारी दोषी

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू विशेष काळजी कक्षात २४ ऑगस्ट २०२६ रोजी लागलेल्या आगीत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी पूर्ण झाली आहे. चौकशी अहवाल शासनास सादर झाल्यानंतर अहवालाच्या आधारे दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. या दुर्घटनेत ३६ बालकांना तातडीने अन्य रुग्णालयांमध्ये सुरक्षित हलविण्यात आले होते. याप्रकरणी, अधिकारी दोषी आढळून आले आहेत, त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून दोन कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे.

चौकशी समितीच्या अहवालानुसार व्हेंटिलेटरची वेळोवेळी आवश्यक देखभाल व दुरुस्ती न होणे, फायर अलार्म व स्प्रिंकलर यंत्रणा कार्यान्वित नसणे, फायर पंप हाऊस कुलूपबंद स्थितीत असणे तसेच उपकरणांच्या देखभाल व तांत्रिक तपासणीत (पान ४ वर)

## पुण्यात एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याची आत्महत्या

### हर्षवर्धन सपकाळ, सिजेपीचे अभिजीत दिपके यांची सरकारवर टीका

पुणे दि.९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी म्हणून ओळख असलेल्या पुणे शहर गेल्या काही महिन्यांपासून पेपरफुटीचं केंद्र बनल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळात होत आहे. नीट पेपरफुटीचं थेट कनेक्शन पुण्यात आढळून आलं, तर सीईटी परीक्षेचाही पेपर फुटला. त्यानंतर, आता एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याने राज्यातील पेपरफुटीचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यातच, पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकाने जीवन संपल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.

पुण्यात एमपीएससी परीक्षेची करणाऱ्या तरुणाने पेपरफुटी आणि आर्थिक अडचणीतून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे. प्रथमेश देशमुख असं आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव असून तो मूळचा धाराशिव जिल्ह्यातील परंड्याचा रहिवाशी आहे. आत्महत्या करणाऱ्या तरुणावर अडीच लाख रुपयांचे कर्ज होते, त्याच आर्थिक अडचणीतून प्रथमेशने आत्महत्या केल्याचा पोलिसांना संशय आहे. मात्र, प्रथमेशने (पान ४ वर)

## राधा पाटील पाठोपाठ निशा मुंबईकर, शुभांगी थोरातसह ८ जणींवर गुन्हा

पुणे दि.९ (प्रतिनिधी)- पुण्यात दहीहंडी उत्सवादरम्यान अश्लील गाण्यांवर नृत्य करणाऱ्या नृत्यांगनांवर आणि आयोजकांवर सहकारनगर पोलिसांनी कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. प्रसिद्ध नृत्यांगना राधा पाटील हिच्यावर आधीच गुन्हा दाखल झाल्यानंतर, आता आणखी आठ नृत्यांगनांविरोधात सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या नव्या कारवाईत महाराष्ट्रातील प्रसिद्ध नृत्यांगना निशा मुंबईकर आणि शुभांगी थोरात यांच्यासह आठ जणींचा समावेश आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी केवळ कलाकारांवरच नाही, तर कार्यक्रमाचे आयोजक आणि मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल केले आहेत. दहीहंडी उत्सवाचा उत्साह, गोविंदांची मोठी गर्दी आणि त्यात रंगलेला लावणी आणि नृत्याचा कार्यक्रम. मात्र, याच कार्यक्रमात अत्यंत अश्लील आणि द्विअर्थी गाणी वाजवून त्यावर अश्लील नृत्य केल्याचा गंभीर आरोप संबंधित नृत्यांगनांवर करण्यात आला आहे.

## अनमॅपिंगद्वारे ३ कोटी मतदारांवर अन्याय, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा सरकारवर गंभीर आरोप

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल करत मतदार याद्यांमधून लाखो मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा धक्कादायक आरोप केला आहे. एसआयआर प्रणालीच्या माध्यमातून सरकारने अनमोली आणि एएसडी नावाचा भस्मासूर तयार करून लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रकार सुरू केल्याची घणाघाती टीका त्यांनी केली.

सपकाळ यांनी आकडेवारी मांडताना सांगितले की, ''विधानसभा निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्रात ९ कोटी ७८ लाख मतदार होते. मात्र, एसआयआर मॅपिंगमधून सुमारे २ कोटी ६ लाख मतदारांना गैरहजर, स्थलांतरित, मृत किंवा दुबार या शीर्षकाखाली वगळण्यात आले आहे. तर १ कोटी २२ लाख मतदारांना अनमॅप च्या नावाखाली संशयाच्या भोवऱ्यात टाकले आहे. अशाप्रकारे तब्बल ३ कोटी २८ लाख (सुमारे ३० टक्के) मतदार यादीतून वगळण्याचा मोठा घोळ सरकारने घातला आहे.''

हा बंगालचा पॅटर्न महाराष्ट्रात राबवला जात असून, या १ कोटी २२ लाख मतदारांची यादी अद्याप निवडणूक आयोगाने प्रकाशित केलेली नाही, असे सपकाळ म्हणाले. ''यादी नसताना हरकती घ्यायला सांगणे हा उलटा न्याय आहे. या याद्या तत्काळ बूथनिहाय आणि ग्रामपंचायत स्तरावर प्रकाशित कराव्यात आणि हरकतींची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत (पान ४ वर)

# बैलपोळा शेतकऱ्यांना दिवाळीसारखा सण

**भारतीय** संस्कृती ही पुरातन संस्कृती आहे. त्याच प्रमाणे भारत कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे संपूर्ण शेतीतील कामे बैलांच्याच मदतीने केली जात होती आणि आताही जातात. त्यामुळे भारतात आपल्याला वेगवेगळे सण उत्सव पहायला मिळतात. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानल्या जातो.कारण पुर्वी संपूर्ण कामे बैलांच्याच मदतीने व्हायची व बैल बीना संपूर्ण कामे अधुरी रहायची. श्रावण महिन्यातील अमावस्येला हा सण उत्सव शेतकरी मोठ्या उत्साहाने बैलांची पूजा अर्चना करून साजरा करतात. या सणाला पिठोरी अमावस्या, मोठा पोळा किंवा बैलपोळा असेही म्हणतात. या दिवशी संपूर्ण परिवार बैलांच्या सेवेत असतात. बैलपोळ्याला शेतकरी दिवाळीसारखा सण साजरा करतात. त्या दिवशी बैलांपासुन कोणतेही काम करून घेतले जात नाही व बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येतो. या सणाची सुरूवात बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर सुरूवात होते. बैलपोळ्याच्या एकदिवस अगोदर मातीचे बैल बनवून त्याची पुजाअर्चना केली जाते व त्यांना नैवेद्य केला जातो. त्याच दिवशी म्हणजे बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर बैलांची पुजा केली जाते त्याला खांदशेकणी असे म्हणतात. कारण वर्षभर बैलांना शेतकरी राबवितो. अशा परिस्थितीत त्यांच्या खांद्याला अनेक जखमा होतात. म्हणूनच म्हणतात 'कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावर' अशी जी म्हण आहे ती सत्य आहे. देशातील करोडो लोकांना अन्न पुरवठा व्हावा या उद्देशाने शेतर्कयांना बैलांपासून काम करून घ्यावे लागते. बैलाला वर्षभर यातना भोगाव्या लागतात. तेव्हाच देशातील करोडो लोकांना अन्नधान्य मिळते. कारण वर्षभर नांगर, वखर, बंडीचे जु त्यांच्या खांद्यावर सतत असते. अशाप्रकारे वर्षेभर शेतात राबराब राबतात. परंतु बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर त्यांची आंघोळ करून त्यांच्या खांद्यावरील जखमांवर हळद लावून त्यांना दिलासा देतात. त्यालाच खांदशेकणी असे म्हणतात. खांदशेकनीच्या दिवशी प्रत्येक शेतकरी आपल्या बैलांना आमंत्रण (आवतन) देतांना म्हणतात 'आज आवतन घ्या उद्या जेवायला या'ज्याप्रमाणे लग्नाकरीता नवरदेवाला सजविल्या जाते व अगोदरच्या दिवशी हळद लावल्या जाते त्याचप्रमाणे बैलाला हळद लावून दुर्सया दिवशी सजवून बैलपोळ्याच्या दिवशी बैलांची आंघोळ करून नीटनेटक्या पध्दतीने बैलांची सजावट करून ढोलताशेरे वाजवुन वाजत-गाजत, नाचत-कुदत बैलांना पोळ्याच्या ठिकाणी एकत्र आणले जाते व प्रत्येक गावागावात किंवा शहरात महत्वाच्या ठिकाणी संपूर्ण बैल एकत्र होतात व संपूर्ण शेतकरी एकमेकांना आलिंगन घालून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देतात. या दिवशी बैल किंवा शेतमजूर यांच्या कामाला पुर्णत: सुट्टी असते. जो बैल वर्षभर शेतात राबतो आणि आपल्यासाठी कष्ट करतो त्याला फक्त बैलपोळ्याच्या दिवशीच विश्रांती मिळते. यानंतर दुर्सयाचं दिवशी तान्ह्या पोळा येतो या दिवशी लाकडाचे बैल सजवुन पोळ्यामध्ये नेण्यात येते व संपूर्ण बालगोपाल तान्ह्या पोळ्यांचा आनंद लुटतात व बैल घरोघरी घेऊन जातात आणि त्याची पुजाअर्चना केली जाते व बालगोपालांना पैसे किंवा भेट वस्तू देऊन त्यांचा आनंद व्दिगुणित केला जातो.अशा प्रकारे मोठ्या व्यक्तींपासुन तर बालगोपालांपर्यंत सर्वच बैलपोळ्याचा व तान्ह्या पोळ्याचा आनंद घेतांना दिसतात. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणांना आगळेवेगळे महत्व आपल्याला दिसून येते सर्वच यात सहभागी होतात. जो व्यक्ती किंवा शेतकरी बैलांना पोळ्यात घेऊन जातो त्याचाही मानसन्मान केला जातो. अशाप्रकारे शेतकऱ्यांसाठी वर्षभर राबर्णाया व प्रत्येक कामात सोबत तत्परतेने काम करणारा, धान्यासाठी वर्षभर कष्ट करणारा शेतर्कयांचा खरा सोबती, सखा जिवलग मित्र म्हणजे बैल. त्यामुळे बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतकरी आपल्या पध्दतीने कष्ट करून शेती पिकवितात व संपूर्ण शेत हिरवागार गालिचाच्या रूपात आपल्याला दिसुन येते.त्यामुळे सर्वसामान्यांना, सामाजिक संस्थांना व सरकारला विनंती आहे की पोळ्याचे औचित्य साधून वृक्षारोपण केले पाहिजे. कारण शेतर्कयांना ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ यांचा नेहमीच सामना करावा लागतो. त्यावर फुंकर घालण्यासाठी वृक्षलागवड अत्यंत आवश्यक आहे. यामुळे गुरांना चारा व सर्वांना शुध्द हवा सुध्दा मिळण्यास मोठी मदत होईल व सृष्टी प्रफुल्लित राहील. बैल पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा! जय जवान जय किसान!

# पोळा

हा शेतकऱ्यांच्या सर्जा-राजाचा उत्सव. शेतकऱ्यांना उत्साहीत करणारा असा हा उत्सव आहे. अनंत कष्ट करून अन्नधान्याचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला आनंदी पहाणे कोणाला आवडणार नाही.



तिथी- पोळा हा उत्सव प्रदेशानुसार आषाढ, श्रावण वा भाद्रपद मासात साजरा केला जातो. महाराष्ट्रात हा उत्सव श्रावण मासातील अमावास्येला साजरा केला जातो.

उद्देश - १. या उत्सवाद्वारे बैलांविषयी एकप्रकारे कृतज्ञता व्यक्त केली जाते.

२. हा उत्सव साजरा केल्याने शेतात भरपूर धान्य पिकते आणि गोधन वाढते, असे समजले जाते.

३. 'पोळ्याच्या दिवशी जे प्राणीमात्र आपल्या कष्टाने मानवाच्या जीवनाला आधारभूत झालेले आहेत, त्यांची पूजा आणि स्मरण केले जाते. उत्सव साजरा करण्याची पद्धत- शेतकऱ्यांमध्ये या उत्सवाला फार महत्त्व आहे. पेरण्या झाल्यानंतर शेतीच्या कामांतून बैल रिकामे झाले म्हणजे त्यांना न्हाऊ-माखू घालायचे, आरती ओवाळायची, नैवेद्य दाखवायचा आणि मग दुपारी रंगवून आणि शृंगारून गावातून मिरवत न्यायचे, असा हा उत्सव सोहळा असतो.

# लोकशाही दिनी ३१ अर्ज दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजीत केला जातो. आज जिल्हास्तरीय लोकशाही दिन जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. यावेळी विविध विभागांचे मिळून ३१ तक्रारी अर्ज दाखल झाले. त्याचा तपशिल याप्रमाणे- पोलीस विभाग-२ आणि इतर साधे निवेदन २९ असे एकूण ३१ अर्ज दाखल झाले,असे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.

# सुदाम भाऊसाहेब शिंदे यांना काव्य भूषण पुरस्कार

वैजापूर, दि. ९ (प्रतिनिधी) - येथील रहिवाशी सुदाम भाऊसाहेब शिंदे याना मुंबई येथील अक्षर मंच काव्य समूह यांनी घेतलेल्या राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेत सलग दोन वर्षे सहभाग घेतल्याने त्यांनाअष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई च्या वतीने 'अष्टपैलू काव्य भूषण पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे,त्यांना मिळालेल्या या पुरस्कारा प्रित्यर्थ येथील साहित्यिक व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी त्यांचा विशेष गौरव केला आहे.

# एक संवाद, एक आधार; जीवनाला जगण्याची नवी आशा

**दरवर्षी** १० सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' म्हणून पाळला जातो. मानवी जीवनाचे अमूल्यत्व अधोरेखित करणारा आणि संकटात सापडलेल्या व्यक्तीच्या पाठीशी संवेदनशीलतेने उभे राहण्याचा संदेश देणारा हा दिवस आहे. आत्महत्या हा केवळ एका व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित प्रश्न नाही; तो कुटुंब, समाज, आरोग्यव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि एकूणच मानवी नातेसंबंधांशी जोडलेला गंभीर सामाजिक व सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील तीव्र मानसिक वेदना, एकाकीपणा, कौटुंबिक संघर्ष, आर्थिक अडचणी, शैक्षणिक किंवा व्यावसायिक ताण, नातेसंबंधांतील तणाव, सामाजिक अपमान, आजारपण किंवा भविष्याबद्दल निर्माण झालेली निराशा अशा अनेक कारणांचा एकत्रित परिणाम तिच्या मानसिक अवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे आत्महत्येकडे केवळ कमजोरी, भ्याडपणा किंवा चुकीचा निर्णय म्हणून पाहणे हा समस्येचा अतिशय संकुचित दृष्टिकोन ठरतो. या समस्येकडे मानवी वेदना, मानसिक आरोग्य आणि सामाजिक परिस्थिती या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक आहे.

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाची सुरुवात २००३ मध्ये इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सुसाइड प्रिव्हेन्शन आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने झाली. आत्महत्या रोखण्यासाठी जागतिक स्तरावर जागरूकता निर्माण करणे, या विषयाभोवती असलेला सामाजिक कलंक कमी करणे आणि प्रतिबंधात्मक उपायांना व्यापक स्वरूप देणे हा या दिवसाचा मुख्य हेतू आहे. २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी 'आत्महत्येविषयीचा दृष्टिकोन बदलूया' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली असून, २०२६ हे या त्रैवार्षिक अभियानाचे अंतिम वर्ष आहे. या अभियानाचा मूलभूत संदेश असा आहे की आत्महत्येविषयी मौन आणि गैरसमज यांना दूर करून खुलेपणाने, संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने संवाद साधला पाहिजे. संकटातील व्यक्तीला ऐकून घेणे, तिच्या भावनांचा आदर करणे, तिच्यावर दोषारोप न करणे आणि योग्य वेळी मदतीशी जोडणे हा प्रतिबंधाचा महत्त्वाचा मार्ग आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते जगभरात दरवर्षी सात लाखांहून अधिक लोक आत्महत्येमुळे मृत्युमुखी पडतात. ही संख्या केवळ आकडेवारी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक संख्येमागे एक व्यक्ती, एक कुटुंब, अनेक नाती आणि अनेक अपूर्ण स्वप्ने असतात. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूचा परिणाम तिच्या कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही; पालक, मुले, भाऊ-बहीण, मित्र, सहकारी आणि संपूर्ण समुदायावर त्याची भावनिक छाया पडते. म्हणून आत्महत्या प्रतिबंधाकडे केवळ घटना घडल्यानंतर प्रतिक्रिया देण्याच्या दृष्टीने पाहण्याऐवजी संकट निर्माण होण्यापूर्वीच व्यक्तीला आधार मिळेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. मानसिक आरोग्यसेवा सुलभ करणे, सामाजिक एकाकीपणा कमी करणे, कुटुंबातील संवाद वाढविणे आणि संकटातील व्यक्तीला मदत मागण्यासाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रतिबंधाची मूलभूत पावले आहेत.

मानसिक आरोग्याबाबत आपल्या समाजातील दृष्टिकोन बदलण्याची आज सर्वाधिक गरज आहे. शरीराला आजार झाला तर आपण डॉक्टरांकडे जातो, औषधोपचार घेतो आणि विश्रांती घेतो; परंतु मनावर ताण आला, नैराश्य जाणवले किंवा सतत अस्वस्थता निर्माण झाली तर त्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती अनेकदा दिसून येते. हे मनाचेच आहे, थोडे सकारात्मक विचार कर, स्वतःला सावर किंवा तुझ्याकडे तर सर्व काही आहे. अशा वाक्यांनी मानसिक वेदना दूर होत नाहीत. प्रत्येक व्यक्तीची संकटे वेगळी असतात आणि त्यांचा तिच्यावर होणारा परिणामही वेगळा असतो. म्हणून दुसऱ्याच्या दुःखाची तुलना आपल्या अनुभवांशी करणे टाळले पाहिजे. मानसिक त्रास हा व्यक्तीच्या चारित्र्याचा दोष नसून आरोग्याशी संबंधित एक गंभीर बाब आहे, ही जाणीव समाजात रुजली पाहिजे.

आत्महत्या प्रतिबंधाचा सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे संवाद. अनेकदा एखादी व्यक्ती संकटात असताना थेट मदत मागत नाही. तिच्या वर्तनात बदल होऊ शकतो, ती अधिक एकाकी राहू शकते, सतत निराश किंवा अस्वस्थ दिसू शकते किंवा पूर्वी आवडणाऱ्या गोष्टींपासून दूर जाऊ शकते. अशा वेळी काय झाले? एवढे विचारून थांबण्याऐवजी तुला काही त्रास होत आहे का?, तुला माझ्याशी बोलायचे असेल तर मी ऐकण्यासाठी आहे, असा विश्वास देणे आवश्यक आहे. संवाद साधताना समोरच्या व्यक्तीचे बोलणे मध्येच तोडणे, दोष देणे किंवा लगेच उपदेश करणे टाळले पाहिजे. काही वेळा व्यक्तीला उपायापेक्षा प्रथम कोणीतरी आपले म्हणणे मनापासून ऐकावे अशी गरज असते. ऐकून घेणे ही साधी कृती असली तरी तिचे भावनिक महत्त्व मोठे असते.

कुटुंबाच्या भूमिकेला या संदर्भात विशेष महत्त्व आहे. कुटुंब व्यक्तीला भावनिक सुरक्षितता देणारे पहिले वतुर्ळ असते. मात्र आधुनिक जीवनशैली, कामाचा वाढता ताण, स्थलांतर, डिजिटल माध्यमांचा अतिरेक आणि बदलती कौटुंबिक रचना यामुळे घरात राहूनही भावनिक अंतर वाढताना दिसते. एकाच घरात राहणारे सदस्य एकमेकांशी बोलण्यासाठी पुरेसा वेळ देत नाहीत. पालकांना मुलांच्या अभ्यासाची, नोकरीची आणि भवितव्याची चिंता असते; पण मुलांच्या मनातील भीती, असुरक्षितता, अपयशाची भावना किंवा भावनिक संघर्ष समजून घेण्यासाठी आवश्यक संवाद कमी पडतो. मुलांच्या यशापेक्षा त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. तुला नेहमी पहिलाच क्रमांक मिळाला पाहिजे. यापेक्षा काहीही झाले तरी आम्ही तुझ्यासोबत आहोत. हा संदेश त्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करू शकतो. विद्यार्थी आणि तरुण हे विशेष संवेदनशील वयोगट आहेत. शिक्षणातील तीव्र स्पर्धा, परीक्षेतील अपेक्षा, प्रवेशाच्या संधी, करिअरची अनिश्चितता, बेरोजगारी, पालकांचा दबाव, मैत्री किंवा प्रेमसंबंधांतील तणाव आणि सामाजिक माध्यमांवरील तुलना यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाचा अनुभव घेतात. आज यशाची व्याख्या अनेकदा गुण, पद, पगार आणि प्रतिष्ठा यांच्याशी जोडली जाते. त्यामुळे अपयश आले की काही तरुणांना स्वतःचे मूल्य कमी झाल्यासारखे वाटू शकते. शिक्षणव्यवस्थेने ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना अपयश हा जीवनाचा एक अनुभव आहे, अंतिम निर्णय नाही, हे समजावून सांगितले पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये समुपदेशन, भावनिक शिक्षण, जीवनकौशल्ये आणि तणाव व्यवस्थापन यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

सामाजिक माध्यमांच्या युगात मानसिक आरोग्याचा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे. इतरांच्या जीवनातील यश, आनंद, प्रवास, आर्थिक संपन्नता आणि सामाजिक प्रतिष्ठेची चित्रे सतत पाहताना व्यक्ती नकळत स्वतःची तुलना इतरांशी करू शकते. मात्र सामाजिक माध्यमांवर दिसणारे जीवन हे संपूर्ण वास्तव नसते. प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष असतात, अपयश असते, चिंता असते आणि काही न सांगितलेल्या वेदनाही असतात. त्यामुळे आभासी जगातील प्रतिमांशी आपल्या वास्तवाची तुलना करणे टाळले पाहिजे. डिजिटल साधनांचा विवेकी वापर, प्रत्यक्ष नात्यांना दिलेला वेळ आणि स्वतःच्या भावनांकडे लक्ष देण्याची सवय मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहे.

आत्महत्या प्रतिबंधाचा प्रश्न




तरुणांपुरताच मर्यादित नाही. आर्थिक संकटात सापडलेले कुटुंब, बेरोजगार युवक, व्यवसायात नुकसान झालेल्या व्यक्ती, शेतकरी आणि कामगार, गंभीर आजाराशी सामना करणारे नागरिक, कौटुंबिक हिंसाचार किंवा सामाजिक भेदभावाचा अनुभव घेणारे लोक आणि एकाकीपणाने त्रस्त वृद्ध या सर्व घटकांच्या मानसिक आरोग्याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. विशेषतः आर्थिक संकटाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम गंभीर असू शकतो. पैसा कमी पडणे ही केवळ आर्थिक समस्या राहत नाही; त्यासोबत कुटुंबाची जबाबदारी, सामाजिक प्रतिष्ठा, भविष्याची चिंता आणि असुरक्षितता जोडली जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीला दोष देण्याऐवजी तिला सामाजिक, आर्थिक आणि भावनिक आधार देणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याचे आव्हान मोठे आहे. अनेक ठिकाणी मानसिक त्रासाला आजार न मानता स्वभावाचा दोष मानला जातो. मानसिक आरोग्यतज्ज्ञांकडे जाणे म्हणजे समाजात आपली प्रतिमा खराब होईल, अशी भीती काही व्यक्तींना वाटू शकते. त्यामुळे मानसिक आरोग्यसेवा गावपातळीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मानसिक आरोग्यविषयक जनजागृती केली पाहिजे. मानसिक आरोग्य हा केवळ मोठ्या शहरातील विषय नसून ग्रामीण समाजाचाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे, ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. आत्महत्या प्रतिबंधात माध्यमांची जबाबदारी अत्यंत मोठी आहे. एखाद्या आत्महत्येच्या घटनेचे वृत्तांकन करताना सनसनाटी मथळे, अनावश्यक तपशील, व्यक्तीला दोष देणारी भाषा किंवा घटनेचे उदात्तीकरण टाळले पाहिजे. संवेदनशील वृत्तांकन समाजाला प्रतिबंधात्मक माहिती देऊ शकते. बातमीसोबत मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन, मदत मिळण्याची साधने आणि गरजूंनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा असा संदेश दिल्यास माध्यमे समाजाच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका बजावू शकतात. वृत्तपत्रे आणि माध्यमे केवळ घटना सांगणारी साधने नसून सामाजिक विचार घडविणारी प्रभावी माध्यमे आहेत. त्यामुळे या विषयाकडे मानवी संवेदना आणि सामाजिक जबाबदारीने पाहणे आवश्यक आहे. शासन आणि आरोग्यव्यवस्थेची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मानसिक आरोग्याच्या सेवा सर्वसामान्य नागरिकांना सहज आणि सन्मानपूर्वक उपलब्ध झाल्या पाहिजेत. मानसिक आरोग्यतज्ज्ञांची उपलब्धता वाढविणे, प्राथमिक आरोग्यव्यवस्थेशी मानसिक आरोग्यसेवा जोडणे, शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि संकटातील व्यक्तींना योग्य मदत मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

आत्महत्या प्रतिबंधासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका ओळखली पाहिजे. प्रत्येक व्यक्ती मानसिक आरोग्यतज्ज्ञ असणे आवश्यक नाही; परंतु प्रत्येकजण संवेदनशील माणूस होऊ शकतो. आपल्या मित्राच्या वर्तनात अचानक बदल जाणवला तर त्याच्याशी संवाद साधता येतो. एखादा सहकारी सतत तणावाखाली दिसत असेल तर त्याची विचारपूस करता येते. कुटुंबातील वृद्ध व्यक्ती एकाकी होत असेल तर तिच्यासोबत वेळ घालवता येतो. विद्यार्थी चिंताग्रस्त दिसत असेल तर त्याच्यावर केवळ अभ्यासाचे दडपण न आणता त्याच्या मनाची अवस्था जाणून घेता येते. संकटातील व्यक्तीला तिच्या समस्यांचे सर्व उत्तर आपल्याकडे नसले तरी योग्य मदत मिळवून देण्यासाठी आपण दुवा बनू शकतो. हीच सामाजिक संवेदनशीलतेची खरी परीक्षा आहे. समाजात मदत मागणे म्हणजे कमजोरी हा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीत मदत मागण्याचे धैर्य हे कमजोरीचे नव्हे, तर आत्मजाणीवेचे लक्षण आहे. आपल्या मनावरचा ताण ओळखणे, तो विश्वासू व्यक्तीसमोर व्यक्त करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञ मदत घेणे ही आरोग्यदायी कृती आहे. मानसिक आरोग्याविषयी बोलताना लाज वाटू नये. जसे ताप आला की आपण उपचार घेतो, तसे मन अस्वस्थ झाल्यावरही मदत घेणे स्वाभाविक मानले पाहिजे. समाजाने मानसिक आरोग्याची चर्चा सामान्य केली तर अनेक व्यक्तींना योग्य वेळी मदत मिळण्याची शक्यता वाढेल. आत्महत्या प्रतिबंधाचा व्यापक अर्थ संकटाच्या अंतिम टप्प्यावर हस्तक्षेप करणे एवढाच नाही. जीवनात अर्थपूर्ण नाती निर्माण करणे, व्यक्तीला सामाजिक स्वीकार मिळवून देणे, भेदभाव कमी करणे, रोजगार आणि सामाजिक सुरक्षिततेच्या संधी वाढविणे, शिक्षणात मानवी मूल्यांना स्थान देणे आणि आरोग्यसेवा सर्वांसाठी सुलभ करणे हा त्याचा मोठा भाग आहे. मानसिक आरोग्य आणि सामाजिक न्याय यांचा जवळचा संबंध आहे. ज्या समाजात व्यक्तीला आपले दुःख व्यक्त करण्याची मोकळीक असते, अपयशानंतर पुन्हा उभे राहण्याची संधी मिळते आणि संकटात मदतीचा हात पुढे होतो, तो समाज मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम असतो. १० सप्टेंबरचा जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आपल्याला म्हणूनच एक महत्त्वाचा सामाजिक संदेश देतो. संकटातील व्यक्तीला तिच्या परिस्थितीसाठी दोष देऊ नका; तिचे म्हणणे ऐका. तिच्या वेदनेची तुलना इतरांच्या वेदनांशी करू नका; तिच्या अनुभवाचा आदर करा. ती मदत मागत असेल तर तिला दुर्लक्षित करू नका; योग्य मदतीपर्यंत पोहोचवा. तिच्या आयुष्यातील एका कठीण प्रसंगाला तिच्या संपूर्ण जीवनाचे अंतिम सत्य मानू नका. परिस्थिती बदलू शकते, योग्य मदत मिळू शकते आणि जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणून संकटातील व्यक्तीला वेळ, आधार, उपचार आणि आशा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या दिवशी आपण आपल्या घरापासून सुरुवात करूया. मुलांशी फक्त त्यांच्या गुणांबद्दल बोलू नका; त्यांच्या भावनांबद्दलही विचारा. तरुणांच्या अडचणींना हट्ट किंवा अपरिपक्वता म्हणून नाकारू नका. वृद्धांच्या शांततेमागे एकाकीपणा आहे का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. मित्राच्या हसऱ्या चेहऱ्यामागे काही वेदना आहेत का, याची विचारपूस करा. कार्यस्थळी सहकाऱ्यांशी मानवी नात्याने वागा. मानसिक आरोग्याविषयी चर्चा करण्यास सुरक्षित वातावरण निर्माण करा. कारण आत्महत्या प्रतिबंधाची सुरुवात कोणत्याही मोठ्या योजनेतून नव्हे, तर आपल्या दैनंदिन वर्तनातील संवेदनशील बदलातून होते. मानवी जीवन हे कोणत्याही एका परीक्षेच्या निकालापेक्षा, कोणत्याही एका नात्यापेक्षा, कोणत्याही एका आर्थिक संकटापेक्षा किंवा कोणत्याही एका अपयशापेक्षा मोठे आहे. आयुष्याच्या वाटेवर संकटे येतात, परंतु संकट म्हणजे जीवनाचा शेवट नव्हे. माणसाला पुन्हा उभे राहण्यासाठी कधी कधी केवळ एक विश्वासू व्यक्ती, काही क्षणांचा मनापासून संवाद आणि योग्य मदतीचा मार्ग आवश्यक असतो. म्हणून समाजाने अशी संस्कृती निर्माण केली पाहिजे की जिथे प्रत्येक व्यक्तीला माझे दुःख कोणीतरी ऐकेल, माझ्या अडचणीची थट्टा केली जाणार नाही आणि गरज पडल्यास मला मदत मिळेल, असा विश्वास वाटेल.

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन हा केवळ एका दिवसाचा उपक्रम ठरू नये. मानसिक आरोग्याविषयीचा संवाद वर्षभर सुरू राहिला पाहिजे. शाळा, महाविद्यालये, कुटुंबे, कार्यस्थळे, आरोग्यसंस्था, माध्यमे आणि समाजसंस्था यांनी एकत्रितपणे संवेदनशील वातावरण निर्माण केले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक आरोग्याला सन्मान मिळाला पाहिजे. दुःख व्यक्त करण्याला कमजोरी समजले जाऊ नये आणि मदत मागण्याला लाजेची बाब मानले जाऊ नये. समाजाच्या प्रगतीचे खरे मोजमाप केवळ आर्थिक विकासात नसून संकटात असलेल्या आपल्या माणसांच्या पाठीशी आपण किती ठामपणे उभे राहतो यात आहे. आजच्या जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त आपण एक सामूहिक संकल्प करूया, मौनाऐवजी संवादाची निवड करूया, उपेक्षेऐवजी आपुलकीची निवड करूया, दोषारोपाऐवजी समजूतदारपणाची निवड करूया आणि निराशेऐवजी आशेचा संदेश देऊया. आपल्या आसपासच्या व्यक्तीच्या मनातील वेदना आपण पूर्णपणे समजू शकूच असे नाही; परंतु ती वेदना ऐकण्याची तयारी आपण नक्की दाखवू शकतो. प्रत्येक संकटग्रस्त व्यक्तीला योग्य वेळी योग्य आधार मिळावा यासाठी आपण दुवा बनू शकतो. एका प्रश्नातून संवाद सुरू होऊ शकतो, संवादातून विश्वास निर्माण होऊ शकतो, विश्वासातून मदतीचा मार्ग खुला होऊ शकतो आणि त्या मदतीतून जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणूनच आजचा संदेश स्पष्ट आहे की एक संवाद साधूया, एक आधार देऊया, मौनाची भिंत तोडूया आणि प्रत्येक जीवनाला जगण्याची नवी आशा देऊया; कारण प्रत्येक जीवन अमूल्य आहे आणि प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# राष्ट्रीय संरक्षण व नौसेना अकादमी आणि सीडीएस परीक्षा रविवारी

## १३ उपकेंद्रांवर ४ हजार ११२ उमेदवार देणार परीक्षा

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्या वतीने राष्ट्रीय संरक्षण व नौसेना अकादमी परीक्षा तसेच संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस)-ख परीक्षा-२०२६ रविवार, दि. १३ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्हा केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी एकूण १३ परीक्षा उपकेंद्रांवर ४ हजार ११२ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

**दोन सत्रात होणार परीक्षा** राष्ट्रीय संरक्षण व नौसेना अकादमी परीक्षा एकूण ११ शाळा व महाविद्यालयांमध्ये दोन सत्रांत होणार आहे. पहिले सत्र सकाळी १० ते दुपारी साडेबारा वाजेपर्यंत, तर दुसरे सत्र दुपारी २ ते साडेचार वाजेपर्यंत होईल.

सीडीएस-ख परीक्षा-२०२६ दोन शाळा व महाविद्यालयांमध्ये तीन सत्रांत घेण्यात येणार आहे. पहिले सत्र सकाळी ९ ते ११, दुसरे सत्र दुपारी साडेबारा ते अडीच वा आणि तिसरे सत्र दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत होईल.

**परिक्षार्थींसाठी सुचना -** परीक्षेतील गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी आयोगाने कडक उपाययोजना केल्या आहेत. परीक्षा कक्षात प्रवेशासाठी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्रासह स्वतःच्या ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे वाहनचालक परवाना यापैकी किमान एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. परीक्षा कक्षात पेपर सुरू होण्याच्या दीड तास अगोदर उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल. प्रवेश प्रमाणपत्र, काळ्या अथवा निळ्या शाईचे बॉलपॉइंट पेन, ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत, मास्क आणि पारदर्शक सॅनिटायझरची बाटली याव्यतिरिक्त अन्य कोणतेही साहित्य परीक्षा कक्षात नेण्यास परवानगी राहणार नाही.

**इलेक्ट्रॉनिक उपकरणांना सक्त मनाई -** डिजिटल डायरी, मायक्रोफोन, मोबाईल फोन, ब्लूटूथ उपकरण, कॅमेराफोन अथवा अन्य कोणतेही संदेशवहन किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरण परीक्षा केंद्रात नेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते उमेदवारांना स्वतःच्या जबाबदारीवर परीक्षा केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर ठेवावे लागेल. या साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी आयोगाची राहणार नाही. प्रतिबंधित साहित्य परीक्षा केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आत आणल्याचे आढळल्यास संबंधित उमेदवाराविरुद्ध फौजदारी व प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. तसेच आयोगाच्या आगामी परीक्षांसाठी संबंधित उमेदवारावर बंदी घालण्यात येऊ शकते. आयोगाच्या ऑनलाइन अर्ज प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले प्रवेश प्रमाणपत्र उमेदवारांसाठी प्रवासाचा पास म्हणून ग्राह्य धरले जाईल. परीक्षेसाठी स्वतंत्र ई-पास अथवा अन्य परवानगीची आवश्यकता राहणार नाही. मात्र प्रवेश प्रमाणपत्रासोबत विहित मूळ ओळखपत्र बाळगणे आणि तपासणीच्या वेळी ते सादर करणे अनिवार्य राहील. परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व उमेदवारांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत, असे सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी कळवले आहे.

# खुनाच्या प्रयत्नात मदत करण्यासाठी लाच घेताना पीएसआय, कॉन्स्टेबल अटकेत

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- खूनाच्या प्रयत्नात न्यायालयीन कोठडीत असलेल्या मुलाला मदत करून न्यायालयात लवकर दोषारोपपत्र पाठवण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच घेणारे मुकुंदवाडी पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक (पीएसआय) प्रशांत पासलकर व अंमलदार सुभाष राठोड यांना एसीबीने मंगळवारी रात्री रंगेहाथ पकडले.

पासलकर याने महिलेकडे १५ हजारांची लाच मागितली होती. तडजोडीअंती १० हजार रुपये देण्याचे ठरले. पहिला हप्ता ५ हजार रुपये देताना एसीबीने ठाण्याच्या आवारातच सापळा रचला, अशी माहिती अधीक्षक माधुरी कांगणे यांनी दिली. मुकुंदवाडी ठाण्यात २ महिन्यांपूर्वी एका सहायक पोलिस निरीक्षकाला लाच घेताना अटक झाली होती.

**चष्मा काढताच झडप-** लाच दिल्यानंतर तक्रारदार महिलेने ठरल्याप्रमाणे डोळ्यावरील चष्मा काढून हातात घेताच एसीबीच्या पथकाने झडप घालून दोघांना पकडले. गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया व घराची झडती उशिरापर्यंत सुरू होती.

# इंद्रध्वज विधानाचा दर्शनासाठी आर्यनंदी कॉलनीत भाविकांची गर्दी संयमित दृष्टीतून जीवन होते सुखमय - आचार्य हेमसागरजी

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - वेदांतनगर, आर्यनंदी कॉलनी येथील श्री १००८ चंद्रप्रभु खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात इंद्रध्वज विधान सानंद व भक्तिमय वातावरणात सुरू आहे. विधानाच्या विविध धार्मिक विधींमध्ये भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत आहेत.



यावेळी धनकुबेर इंद्र सौभाग्य महावीर प्रकाश राजेंद्र सेठी परिवार धोंडराईवाला यांना लाभले. शांतिधारा करण्याचा मान सौ. किरण शैलेंद्रजी सेठी परिवाराला मिळाला, तर आचार्य हेमसागरजी गुरुदेव यांच्या पादप्रक्षालनाचे सौभाग्य किरण शैलेंद्रजी सेठी यांना प्राप्त झाले.

आरतीचे

सौभाग्य सौ. सुनीता कासलीवाल, निशाजी बडजाते, सारिका पहाडे, पूजा ठोले, ज्योती बिनायके, संगीता सेठी, शर्मिला गंगवाल, अनुजी जैन, वंदना पाटनी आणि मंजूजी अजमेरा यांना मिळाले.अशी माहिती विधान सयोजक सजय पापडीवाल यानी दिली.

यावेळी आयोजित प्रवचनात आचार्य हेमसागरजी महाराज म्हणाले की, जीवनात चांगल्या कामांसोबत वाईट कर्महीही येत असतात. आपली दृष्टी चांगली असेल तर जीवन सुखमय आणि शांततामय होते. मात्र डोळ्यांची नजर खराब झाली तर त्याचा परिणाम मन आणि व्यवहारावरही होतो. ज्यांनी डोळ्यांवर संयम ठेवला, त्यांचे जीवनही संयमित होत जाते.

पापाचा शुभारंभ अनेकदा डोळ्यांपासून होत असतो. डोळे चंचल असतात; ते इकडे-तिकडे फिरत राहतात. त्यामुळे मनावर आणि विचारांवर संयम ठेवणे आवश्यक आहे. मनुष्य जशी कर्मे करतो, त्याला त्याचप्रमाणे फळ मिळते, असे आचार्यश्रींनी सांगितले. पुढे ते म्हणाले की, ज्या घरात वडीलधाऱ्यांचा सन्मान केला जातो, त्या घरात सदैव स्वर्गासारखे वातावरण निर्माण होते. संस्कार, संयम, सद्विचार आणि वडीलधाऱ्यांचा आदर याम ुळे कुटुंबात सुख, शांती आणि समाधान नांदते, असा संदेश त्यांनी दिला. इंद्रध्वज विधानाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, विविध धार्मिक अनुष्ठानांमध्ये भाविकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळत आहे.

# शिक्षकांचा सन्मान म्हणजे ज्ञानपरंपरेचा गौरव

## अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे ६५ शिक्षकांचा कुटुंबीयांसह सन्मान





छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - शिक्षक दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने आयोजित शिक्षक सन्मान सोहळा समर्थ राममंदिर येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात शहरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ६५ शिक्षकांचा त्यांच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी प्रास्ताविकातून उपस्थित मान्यवर, गुरुजन आणि शिक्षक कुटुंबीयांचे स्वागत केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी भारतीय शिक्षणपरंपरेचा गौरवपूर्ण इतिहास मांडला. भारतात प्राचीन काळापासून गुरुकुल पद्धतीने शिक्षण देण्याची परंपरा असून, शिक्षकांना 'गुरुजी' म्हणून आदराने संबोधले जात असल्याचे त्यांनी सांगितले. परकीय राजवटीच्या काळात या शिक्षणपरंपरेला मोठा धक्का बसला; मात्र स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षकांनी शिक्षणव्यवस्थेला नव्याने उभारी देत दर्जेदार शिक्षणाचा भक्कम पाया घातला. भारताला ज्ञानाच्या क्षेत्रात पुढे नेण्यास तसेच भविष्यात विश्वगुरू बनविण्यात शिक्षकांचे योगदान अत्यंत म हत्त्वाचे आहे. याच कृतज्ञतेच्या भावनेतून हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आल्याचे नाईक यांनी स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे म नपा शिक्षणाधिकारी संजीव सोनार यांनी शिक्षकांच्या कार्याचा गौरव करताना, समाज आणि राष्ट्र घडविण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत मोलाची असल्याचे सांगितले. विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करत असून, त्यांच्या योगदानाम ुळे भारतीय शिक्षणक्षेत्राने मोठी प्रगती केली असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष वेदशास्त्रसंपन्न दुर्गादास मुळे गुरुजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून जुन्या आणि नव्या शिक्षण पद्धतीतील बदलांवर प्रकाश टाकला. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि करपात्री महाराज यांच्याशी संबंधित प्रसंग सांगत त्यांनी देशात वेदशाळा उभारण्यामागील प्रयत्नांचा किस्सा उपस्थित शिक्षकांसमोर मांडला. त्यांच्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण भाषणाने उपस्थित शिक्षक मंत्रमुग्ध झाले. या वेळी अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेल्या दुर्गादास मुळे गुरुजी यांचा सुधीर नाईक व सुचेता पालोदकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच प्रमुख पाहुणे संजीव सोनार व गुजराती शाळेचे अध्यक्ष राजेश मेहता यांचे स्वागत दीपक कुलकर्णी, दिलीप लाड, वैभव जोशी व मोहन काळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता नगरकर व सुरेखा पारवेकर यांनी केले, तर सुचेता पालोदकर यांनी आभार मानले. यावेळी अंजली देशपांडे, सुभाष जोशी, छाया खोचे, स्मिता जोशी, कालिदास त्रिवेदी, सीमा नांदापूरकर, ॲड. अश्विनी कुलकर्णी, प्रसाद लिगदे, अनिल देशपांडे यांच्यासह म हासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सन्मानमूर्ती शिक्षक आणि त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांचा सन्मान हा केवळ व्यक्तीचा गौरव नसून ज्ञान, संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्याचा सन्मान आहे, अशी भावना या सोहळ्यातून व्यक्त झाली.

# राज्यस्तरीय बैठक : मराठा आरक्षणात ओबीसी सारख्या सर्व सवलती द्या!

## - जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची मागणी




नाशिक, दि. ९ (प्रतिनिधी) - मराठा समाजाचे सर्व प्रश्न सरकारने सोडवावेत यात प्रामुख्याने आरक्षणाचा प्रश्न ऐरणी वर असुन ज्यांचे कडे पुरावे असतील, ज्यांच्या वंशावळी जुळतील त्यांची जात प्रमाणपत्रे आणि व्हॅलिडिटी द्यावी व न्याय द्यावा परंतु ज्यांचे कडे काही एक पुरावा नाही त्यांचे काय? असा घणाघात मराठा समाजाच्या वतीने उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या बैठकीत समारोपाच्या मुख्य भाषणात केला असून नमुद केले की, राज्य शासनाचे उच्च न्यायालयातील प्रकरणाकडे एकाग्रता ठेऊन कार्य सुरु नसून सर्वोच्च न्यायालयातील क्यूरेटिव्ह पिटीशनमध्ये सुधारीत कायदेशीर व घटनात्मक तरतुद असलेल्या तरतुदीचे अर्ज दिला नाही तर तिथे सुद्धा आपण ही केस हरणार आहोत आणि अशीच स्थिती मुंबई उच्च न्यायालयात असून सर्वोच्च न्यायालयाने मनाई केलेल्या मागण्या राज्य शासनाचे वतीने सतत केली जात असून ही केस सुद्धा हातातून गेल्या सारखी स्थिती असून आम्ही यासाठी अत्यंत अभ्यासू असे सुधारीत कायदेशीर व घटनात्मक तरतुदीच्या विविध अशा ६० पेक्षा जास्त घटना पिठाचे निर्णय पाननिहाय असलेले पॉवर पॉईट प्रेझेंटेशन असलेले सादरीकरण उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री यांनी स्वतः पहावे अशी नमुद करून त्यांनी मागणी केली की,ओबीसी सारख्या बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षण वयाची व नोकरीत वयाची अट ओबीसी सारखी ठेवण्याची सवलती मराठा समाजाला देतांना राजकीय आरक्षण वगळता द्याव्यात जेणे करून ओबीसी-मराठा हा निर्माण झालेला वाद संपुष्टात येईल आणि 'फुले शाहू आंबेडकर ' यांचा महाराष्ट्र हे चित्र परत देश भरात जाईल. असे म्हणुन त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे दि ९ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२६ दरम्यान केलेले अन्नत्याग आंदोलन उपोषणाची सविस्तर माहिती दिली व नमुद केले की हे उपोषण राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी होते आणि आमच्या उपोषणाची घोषणा झाली तोपर्यंत महाराष्ट्रात कोणतेही उपोषण होणार असल्याची घोषणा झालेली नव्हती म्हणुन हे उपोषण फक्त राज्य शासनाचे मराठा समाजाच्या मागण्या कडे लक्ष वेधण्या साठी होते न की कोणाच्या विरोधात होता.

पुढे अधिक सविस्तर बोलतांना ते म्हणाले की, स्व आण्णा साहेब पाटील महामंडळास व्याज परतावा आणि पुढील कामा साठी १० हजार कोटी,सारथी च्या विद्यार्थी उपक्रमा साठी,परदेशी जाऊन उच्च शिक्षणा साठी अधिकच्या ३०० संस्थांनाच्या निवड करून पात्रता साठी ५५% गुण एवढी मर्यादा ठेऊन ५ हजार कोटींचा निधी द्यावा, आंदोलनातील सर्व गुन्हे तातडीने परत घ्यावेत, मराठा समाजा तील तरुणांच्या प्रलंबित नियुक्त्या तात्काळ देऊन मार्ग मोकळा करतांना न्याय देण्याची भूमिका ठेवावी, अशी व इतर प्रलंबित मागण्याची अपूर्ण असलेली पूर्तता करण्याची मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या राज्य स्तरीय बैठकीच्या समारोपा च्या मार्गदर्शनात केली.

उपस्थित राज्य भरातील मराठा समाजाला देण्यात आलेले एसईबीसी आरक्षण, सारथी संस्था,अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ याबाबतचे सर्व प्रश्न सरकारने सोडवावेत, अन्यथा राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असाइशारा देखील मराठा क्रांती मोर्चाने दिला आहे. नाशिकच्या कालिका माता मंदिर सभागृहात ८ ऑगस्ट मंगळवारी मराठा समाजाची राज्यस्तरीय बैठक झाली.मराठ क्रांती मोर्चाच्या समन्वयकां सह मराठा सम ाजाचे राज्यभरातील निमंत्रित यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते या बैठकीनंतर मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांसह प्रतिनिधींनी पत्रकारांशी संवाद साधला. मराठा क्रांती म ोर्चाचे समन्वयक या सह उच्च न्यायालयातील मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे सह राजेंद्र कोंढरे, राजाभाऊ, शेटे, केशव अण्णा पाटील, दादासाहेब पाटील, हरिभाऊ बोडखे, विजय काकडे, संजय भोर, रविंद्र बनसोड, माधव देवसरकर, राजेंद्र चित्रे, विलास पांगरकर, परमेश्वर नलावडे, प्रशांत इंगळे, प्रदीप बिल्लोरे आदींसह राज्य भरातील समाज बांधव मोठ्या संख्येने बैठकीला हजर होते. या बैठकीचे प्रस्तविक करण गायकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार विलास पांगरकर यांनी केले तर सूत्रसंचालन गणेशराव जाधव यांनी केले. या राज्य स्तरीय बैठकीचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाच्या पूर्व तयारीचा आयुक्तांनी घेतला आढावा



छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दि. १७ सप्टेंबर रोजी सिद्धार्थ उद्यान येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मुख्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीला वेग आला असून, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी आज सिद्धार्थ उद्यान येथे पाहणी करून विविध व्यवस्थांचा आढावा घेतला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमि त्त मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमस्थळी करण्यात येत असलेल्या पूर्वतयारीची आयुक्त येडगे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी मान्यवरांचे आगमन व निरोप व्यवस्था, हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठीची व्यवस्था, व्यासपीठ व मंडप व्यवस्था, मान्यवरांची आसन व्यवस्था, ध्वजारोहणाची व्यवस्था, कार्यक्रमस्थळाची स्वच्छता, विद्युत व प्रकाश व्यवस्था, ध्वनी व्यवस्था तसेच परिसरातील इतर आवश्यक सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कार्यक्रम ादरम्यान नागरिक व मान्यवरांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या समन्वयाने व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

दरम्यान, हुतात्मा स्तंभ परिसरात लक्ष्मीकांत तांबोळी यांनी लिहिलेल्या मराठवाडा गीताची कोरीव शिळा जुनी झाल्याचे निदर्शनास आले. सदर कोरीव शिळा नव्या स्वरूपात, सुबक व शोभनीय पद्धतीने तयार करून परिसरात बसविण्याचे निर्दे श आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिन हा शहरासाठी तसेच संपूर्ण म राठवाड्यासाठी ऐतिहासिक आणि भावनिकदृष्ट्या महत्त्वाचा दिवस असल्याने, कार्यक्रमस्थळावरील सर्व व्यवस्था दर्जेदार, सुस्थितीत आणि नियोजनबद्ध असाव्यात, याची विशेष काळजी घेण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक ती कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून दिनांक १६ सप्टेंबर रात्रीची अंतिम पाहणीसाठी परिसर सज्ज ठेवण्याचेही त्यांनी निर्देशित केले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील, कार्यकारी अभियंता विद्युत मोहिनी वारभुवन व इतर अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# कुणबी जात प्रमाणपत्र नोंदी शोधण्यासाठी संकेतस्थळाची मदत घ्या - विभागीय आयुक्त

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक जुन्या अभिलेखांतील नोंदी आता जिल्ह्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर गावनिहाय उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांना या नोंदी सहज शोधता व डाउनलोड करता येणार असून, उपलब्ध नोंदीच्या आधारे वंशावळ जोडून जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येईल, अशी माहिती छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिली.

न्यायमूर्ती (निवृत्त) संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या कुणबी नोंदी संबंधित जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या पूर्वजांच्या जुन्या नोंदी शोधण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर 'कुणबी मराठा दस्त नोंदी' हा पर्याय उपलब्ध आहे. जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळाचा पत्ता https://chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in असा आहे. या संकेतस्थळावर 'कुणबी मराठा दस्त नोंदी' हा पर्याय निवडल्यानंतर तालुकानिहाय नोंदी पाहता येतात. उदाहरणार्थ, सोयगाव तालुक्यात उपलब्ध असलेल्या नोंदींमध्ये गावाचे नाव, अभिलेखाचा प्रकार, अभिलेखाचा उपप्रकार व संबंधित व्यक्तीचे नाव अशी माहिती दिली आहे. सोयगाव तालुक्यात ३१ नोंदी उपलब्ध असून, त्यामध्ये 'रामचंद्र संपत पाटील' यांच्या 'कुणबी' नोंदीचा समावेश आहे. संबंधित व्यक्तीची नोंद उपलब्ध असल्यास नागरिकांना त्या नोंदीचा दस्तऐवज संकेतस्थळावरून डाउनलोड करता येतो. संबंधित व्यक्तीशी आपले नाते सिद्ध होत असल्यास, त्या दस्तऐवजाची प्रत अर्जासोबत जोडता येते. त्यासाठी संबंधित व्यक्तीपासून अर्जदारापर्यंतची वंशावळ उपलब्ध पुराव्यांच्या आधारे जोडणे आवश्यक आहे. कुणबी जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना उपलब्ध नोंद व अर्जदाराचे संबंधित व्यक्तीशी असलेले नाते यांचा योग्य मेळ असणे आवश्यक आहे. केवळ नोंद उपलब्ध असल्याने प्रमाणपत्र आपोआप मिळत नाही. नियमानुसार आवश्यक कागदपत्रे व वंशावळीच्या पुराव्यांची पडताळणी झाल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाते. राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर अशा नोंदी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी संबंधित जिल्ह्याच्या संकेतस्थळावर जाऊन आपल्या गावातील व पूर्वजांशी संबंधित नोंदी शोधाव्यात. या नोंदी नागरिकांपर्यंत सहज उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व त्यांच्या अधीनस्थ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले आहेत. नागरिकांनी उपलब्ध नोंदींचा लाभ घेऊन आवश्यक कागदपत्रे व वंशावळ जोडून जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

# छत्रपती संभाजीनगरात १३ सप्टेंबरला २२६ वी रायन मिनिथॉन ७० हून अधिक शाळांमधील खेळाडूंचा सहभाग

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मैदानावर सकाळी ६.३० वाजता स्पर्धेला सुरुवात

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - रायन स्पोर्ट्स क्लबच्या वतीने १३ सप्टेंबर २०२६ रोजी २२६ वी रायन मिनिथॉन आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा सकाळी ६.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठाच्या मैदानावर होणार आहे. जालना आणि छत्रपती संभाजीनगर येथील ७० हून अधिक शाळांना या स्पर्धे साठी आमंत्रित करण्यात आले आहे.

रायन स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक अध्यक्ष डॉ. ए. एफ. पिंटो आणि मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. ग्रेस पिंटो यांच्या मार्गदर्शनाखाली क्लब गेल्या २७ वर्षांपासून देशातील विविध भागांत रोड रेसचे आयोजन करत आहे. आतापर्यंत २२५ रोड रेस आयोजित करण्यात आल्या आहेत. याच मालिकेतील २२६ वी रायन मिनिथॉन छत्रपती संभाजीनगरात आयोजित केली जात आहे.

**विविध वयोगटांसाठी होणार धावण्याची स्पर्धा**

'विविधतेत एकता' हा संदेश देण्याच्या उद्देशाने रायन स्पोर्ट्स क्लबकडून विविध ठिकाणी मिनिथॉन आयोजित केली जाते. यंदाच्या स्पर्धेत अंडर-१२, अंडर-१४ आणि अंडर-१६ वयोगटातील मुले आणि मुली सहभागी होणार आहेत.

अंडर-१२ मुले व मुली : १ जानेवारी २०१५ किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू २ किमी, अंडर-१४ मुले व मुली : १ जानेवारी २०१३ किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू ३ किमी

- अंडर-१६ मुली : १ जानेवारी २०११ किंवा त्यानंतर जन्मलेल्या खेळाडू ३ किमी.
- अंडर-१६ मुले : १ जानेवारी २०११ किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू ४ किमी.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

शाळेतील खेळाडूंनी मिळवलेल्या गुणांच्या आधारे ओव्हरऑल चॅम्पियनशिप निश्चित केली जाणार आहे.

**१० सप्टेंबरपर्यंत प्रवेशिका स्वीकारणार**

वैयक्तिक प्रवेशिका १० सप्टेंबर २०२६ पर्यंत सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत शाळेच्या कार्यालयात जमा करता येतील. प्रवेशिकेसोबत शाळेचे ओळखपत्र, शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र, आधार कार्ड आणि पालकांचे संमतीपत्र (अंडरटेकिंग) देणे आवश्यक आहे.

**पोलीस आणि वाहतूक विभागाचे सहकार्य**

मिनिथॉनबाबत पोलीस विभागाला यापूर्वीच माहिती देण्यात आली आहे. पोलीस आयुक्त कार्यालय, बेगमपुरा पोलीस, दामिनी पथक आणि वाहतूक पोलिसांकडून सुरक्षा तसेच वाहतूक व्यवस्थेसाठी सहकार्य मागण्यात आले आहे. संबंधित विभागांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

**गरज पडल्यास वैद्यकीय सुविधा**

दौडेदरम्यान एखाद्या खेळाडूला आरोग्याशी संबंधित अडचण आल्यास तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, यासाठीही व्यवस्था करण्यात आली आहे. एमजीएम रुग्णालयाचे मुख्य अधीक्षक डॉ. सोमानी, एमजीएम रुग्णालयाचे डीन, सिव्हिल रुग्णालयाचे अधीक्षक, डॉ. विजय निकम (मेहर हॉस्पिटल), डॉ. किरण ठाकरे (मातोश्री हॉस्पिटल) तसेच इतर रुग्णालयांकडून वैद्यकीय मदतीसाठी सहकार्य मागण्यात आले आहे.

**पालकांचे फिटनेस अंडरटेकिंग आवश्यक**

मिनिथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूच्या पालकांनी त्यांचे पाल्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे अंडरटेकिंग देणे आवश्यक आहे. सर्व शाळांनी पालकांकडून हे अंडरटेकिंग घेऊनच विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घ्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**पाणी आणि मोबाईल टॉयलेटची व्यवस्था**

स्पर्धेसाठी येणाऱ्या खेळाडूंसाठी पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेची व्यवस्था करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर नगर परिषदेच्या सहकार्याने कार्यक्रमस्थळी मोबाईल टॉयलेट व्हॅनचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

**विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**

कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील अधिकारी आणि मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरचे महापौर समीर राजुरकर, माजी महापौर नंदकुमार घोडेले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, पोलीस आयुक्त, बेगमपुरा पोलीस निरीक्षक, एमजीएम रुग्णालयाचे अधीक्षक, डॉ. विजय निकम, डॉ. किरण ठाकरे, दामिनी पथकाचे पोलीस निरीक्षक, भेंडा फॅक्टरीचे सरपंच सुनील खरात आणि जालना महानगरपालिकेचे नगरसेवक जगदीश भारतीय यांचा समावेश आहे.

# 'बैल पोळा' कवितेचे कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी पोळ्याच्या पूर्व संध्येला कविता शिकविली



वैजापूर, दि. ९ (प्रतिनिधी) - मराठवाड्याचे बाल साहित्यिक व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची इंग्रजी स्टेट बोर्ड माध्यमाच्या इयत्ता ५ व्या वर्गाला'बैल पोळा',कविता मागील बारा वर्षांपासून राज्यभर विद्यार्थी शिकत आहेत.

पोळ्याचे औचित्य साधत त्यांनी येथील सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या विद्यालयात जाऊन पोळ्याच्या पूर्व संध्येवर त्यांनी आपली'बैल पोळा'ही कविता विद्यार्थ्यांना शिकवून शासनाचे धोरण कवी विद्यार्थ्यांच्या भेटीला याचे दर्शन विद्यार्थ्यांना घडविले.

कवितेचे कवी प्रत्यक्ष समोर येऊन कविता शिकवीत आहेत हे पाहून सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या विद्यालयातील विद्यार्थी खूप आनंदले.कवीला प्रत्यक्ष समोर पाहुन मुले आनंदली. कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी कवितेचे टाचन काढून कविता शिकविली.

बैलांना पोळा दिनी जसे सजवितात तसे चित्र दाखवून, कविता गाऊन,प्रश्न विचारून व हसत-खेळत कविता शिकविली. 'बैल पोळा'कवींच्या द्वारे शिकण्याचा लाभ शंभर विद्यार्थ्यांनी घेतला.पोळ्याचे औचित्य साधत या शाळेच्या व्यवस्थापिका माजी नगराध्यक्षा शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी यांनी राजपूत यांना कविता शिकविण्यासाठी निमंत्रित केले होते.या प्रसंगी प्राचार्य किशोर साळुंके, सहाय्यक श्री.बापट, श्री. सोनवणे, श्रीमती वर्षा व वर्ग शिक्षकांनी सहाय्य केले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# कुणबी मराठा जात प्रमाणपत्र : जिल्ह्यात आजपासून मंडळनिहाय विशेष शिबिरे

## न्या.शिंदे समिती स्थापनेपासून आतापर्यंत २५९५८ जणांना प्रमाणपत्रांचे वाटप

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- न्या. संदीप शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर जिल्ह्यात मराठा कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी जात प्रमाणपत्रांचे २५ हजार ९५८ जणांना वाटप करण्यात आले आहे,अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त झाली आहे. जात प्रमाणपत्रांचे वाटप व आढळलेल्या नोंदींची पाहणी करता यावी यासाठी जिल्ह्याभरात गुरुवार दि.१० पासून मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र सुलभ, पारदर्शक आणि जलदगतीने मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याअंतर्गत दि. १० ते १७ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व ८४ महसूल मंडळांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी नोंदींसाठी विविध शासकीय विभागांकडील दस्तऐवज तपासण्यात आले. ह्या नोंदी जुन्या, निजामकालीन, उर्दू काही मोडी लिपीतील होत्या. प्राप्त माहितीनुसार ५३२ गावांमधील नोंदींची तपासणी करण्यात आली. त्यात कारागृह अधीक्षकांकडे १५, भूमि अभिलेख विभागाकडे ९२४,मराठवाडा पुरालेख विभागाकडे ३५८, महसूली अभिलेख्यांमध्ये ५२४, शैक्षणिक अभिलेख्यांनुसार ६११, मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांकडे २५३५, जन्ममृत्यू नोंदी ३५ अशा एकूण ५००२ नोंदी सापडल्या. ८८५ ग्रामपंचायतींमधील १३३२ गावांपैकी ५३२ गावांमध्ये या नोंदी सापडल्या. या नोंदी आढळल्या असल्या तरी या नोंदींसाठी ३० लाख ८ हजार ५६२ नोंदी तपासण्यात आल्या. सापडलेल्या नोंदींचे स्कॅनिंग करुन जतन करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात आढळून आलेल्या कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी नोंदी या जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवरही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत म्हणजेच न्या. संदीप शिंदे समिती स्थापन झाल्यापासून २६ हजार ५४ जणांना जातप्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केले होते. त्यापैकी २५ हजार ९५८ अर्ज मान्य करण्यात आले असून ९४ जणांचे अर्ज नाकारण्यात आले आहेत.

**तालुकानिहाय मान्य केलेल्या अर्जांची संख्या याप्रमाणे-**

छत्रपती संभाजीनगर-२१०८, पैठण-१०३०, फुलंब्री-१७९७, वैजापूर-४८३१, गंगापुर-२०२४७, सिल्लोड-२९५०, सोयगाव-१०५, कन्नड-८७८८, खुलताबाद-२३०२ असे एकूण जिल्ह्यात २५ हजार ९५८ जणांचे अर्ज मान्य करण्यात आले आहेत. तर ९४ जणांचे अर्ज नाकारण्यात आले. दोघांचे अर्ज अद्याप प्रलंबित असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातून देण्यात आली.

**हैदराबाद गॅझेटीयर नोंदीनुसार १६० जणांना प्रमाणपत्र**

तसेच दि.२ सप्टेंबर २०२५ च्या शासननिर्णयानुसार हैद्राबाद गॅझेटीयर मधील नोंदी विचारात घेऊन १८० जणांचे अर्ज प्राप्त झाले त्यापैकी १६० जणांचे अर्ज मान्य आले. १८ जणांचे अर्ज नाकारण्यात आले तर दोघांचे अर्ज प्रलंबित आहेत.

**११४२ प्रकरणांमध्ये जातवैधता प्रमाणपत्र**

तसेच न्या. शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर जातवैधतेसाठी १३५३ जणांचे अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ११४२ जणांचे प्रकरणे वैध ठरवून त्यांना वैधता प्रमाणपत्रही देण्यात आले. ११ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आले.प्रलंबित प्रकरणे १७९ आहेत. २१ प्रकरणे अन्य कारणांनी निकाली काढण्यात आले आहेत.

दरम्यान गुरुवार दि.१० पासून जिल्ह्यात मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात या नोंदी पाहणे तसेच प्रमाणपत्रासंबंधी कामकाज होणार आहे.

**शिबिरांचे वेळापत्रक याप्रमाणे-**

अपर तहसिल छत्रपती संभाजीनगर- (एकूण मंडळ-५) दि.१० भावसिंगपुरा, दि.११-पंढरपूर, दि.१२ कांचनवाडी, दि.१५ उस्मानपुरा, दि.१७ – छत्रपती संभाजीनगर.



छत्रपती संभाजीनगर (एकूण मंडळ-९)- दि.१०-चौका, दि.११ वरुड काझी, पिसादेवी, दि.१२- शेकटा, लाडसावंगी, दि.१५-चिकलठाणा, करमाड, दि.१६-कचनेर, चित्तेपिंपळगाव.

पैठण (एकूण मंडळ-१२)- दि.१०-पाचोड, आडूळ, दि.११-आपेगाव, विहामांडवा, दि.१२- पैठण, पिंपळवाडी, दि.१५-बालानगर, नादर, दि.१६-ढोरकीन, निलजगाव, दि.१७-बिडकीन, लोहगाव.

फुलंब्री (एकूण मंडळ-५)- दि.१०-आळंद, दि.११-बाबरा, दि.१५-पिरबावडा, दि.१६-वडोद बाजार.

खुलताबाद (एकूण मंडळ-४)- दि.१०- खुलताबाद, दि.११- वेरुळ, दि.१२- सुलतानपूर, दि.१३-बाजारसावंगी.

कन्नड (एकूण मंडळ-१०)- दि.१०-नाचनवेल, चिंचोली, लिंबाजी, दि.११- देवगाव रंगारी, चापानेर, दि.१२-हतनूर, चिकलठाण, दि.१३-कन्नड-नागद, दि.१५- करंजखेडा.

सिल्लोड (एकूण मंडळ-११)- दि.१०-भराडी, बोरगाव बाजार, आमठाणा, दि.११- सिल्लोड, पालोद, निल्लोड, दि.१५- अंभई, दि.१६-अजिंठा, शिवना, दि.१७-गोळेगाव बु., उंडणगाव.

सोयगाव (एकूण मंडळ-४)- दि.११- सोयगाव, सावळदबारा, दि.१५-जरंडी, दि.१६- बनोटी.गंगापूर (एकूण मंडळ-१२)- दि.१०-वाळूज, तुर्काबाद, दि.११-आसेगाव, गाजगाव, दि.१२- हर्सूल, डोणगाव, दि.१५-सिद्धनाथ वडगाव, गंगापूर, दि.१६-मांजरी, जामगाव, दि.१७-भेंडाळा, शेदूरवादा. वैजापूर (एकूण मंडळ-१२)- दि.१२-गारज, शिऊर, दि.११- लोणी खु., जानेफळ, दि.१२-खंडाळा, बोरसर, दि.१५-लासूरगाव, महालगाव, दि.१६-बाबतरा, नागमठाण, दि.१७-वैजापूर, घायगाव.

# मराठवाड्यात ३ लाख १६ हजारांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप; जात पडताळणीची १६ हजारांहून अधिक प्रकरणे निकाली

## शासनाच्या सकारात्मक कार्यवाहीची उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडून माहिती; ५७ लाख नोंदी जनतेसाठी संकेतस्थळावर उपलब्ध


छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाकडून सातत्याने कार्यवाही करण्यात येत असून, आतापर्यंत प्राप्त झालेल्या ३ लाख १७ हजार ५६९ अर्जांपैकी ३ लाख १६ हजार ९७७ नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच जात पडताळणीसाठी प्राप्त २१ हजार ५१ अर्जांपैकी १६ हजार ११० प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. शासनाची कार्यवाही पारदर्शक असून, मराठा समाजाला कायदेशीर व टिकणारे आरक्षण देण्याची शासनाची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज स्मार्ट सिटी कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी आमदार प्रसाद लाड उपस्थित होते.

शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर मराठवाड्यात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देताना मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या आठ जिल्ह्यांमध्ये कुणबी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. एकूण ३,१७,५६९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३,१६,९७७ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. याशिवाय २,९५,३०५ प्रमाणपत्रे १० टक्के आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जात पडताळणी प्रक्रियेबाबत माहिती देताना मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले की, मराठवाड्यात २१,०५१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६,११० प्रकरणे निकाली काढून प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. या प्रक्रियेत केवळ ६४ प्रकरणे नामंजूर झाली असून, ही संख्या एकूण अर्जांच्या तुलनेत सुमारे ०.३ टक्के आहे. उर्वरित प्रकरणांवरही नियमानुसार कार्यवाही सुरू असून, नागरिकांना आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत.

शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जुन्या अभिलेखांच्या माध्यमातूनही नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत शोधण्यात आलेल्या ५७ लाख नोंदी जनतेला पाहता याव्यात यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत स्तरापर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठी तसेच नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

न्यायमूर्ती शिंदे समितीचा मराठवाडा दौरा ७ सप्टेंबरपासून सुरू झाला असून, या अनुषंगाने विभागातील प्रशासनाशी समन्वय साधून कार्यवाहीचा आढावा घेण्यात येत आहे. आजच्या बैठकीत उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच जात पडताळणी समितीचे प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. स्थानिक पातळीवरील कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधण्यात आला. हैदराबाद गॅझेटियरच्या अनुषंगाने प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असून, यासंदर्भातील अर्जांबाबत महाधिवक्त्यांचे कायदेशीर मत



घेण्यात येणार आहे. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटियर लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजाला न्याय देताना संविधानिक व न्यायिक चौकटीत राहून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी शासन पूर्णपणे सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासन मराठा समाजाला कायदेशीर आणि टिकणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्याचवेळी इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाला किंवा त्यांच्या हक्कांना कोणताही धक्का लागू नये, याचीही शासनाकडून पूर्ण दक्षता घेतली जात असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले.

प्रशासकीय यंत्रणेकडून सुरू असलेली कार्यवाही, उपलब्ध करून देण्यात आलेल्या नोंदी, प्रमाणपत्रांचे वाटप आणि जात पडताळणीची प्रकरणे याबाबतची माहिती संबंधित घटकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शासनाची ही कार्यवाही अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने करण्यात येत असल्याचेही मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.

# विविध विकासकामांची आयुक्त अमोल येडगे यांच्याकडून स्थळपाहणी

## पीएमएवाय, शाळा, कचरा प्रक्रिया प्रकल्प, महिला वसतिगृहांसह विविध कामांचा घेतला आढावा; निर्धारित मुदतीत कामे पूर्ण करण्याच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी शहरातील विविध विकासकामांची स्थळपाहणी करून कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. संबंधित अधिकारी व कंत्राटदारांनी कामांची गती वाढवून निर्धारित मुदतीत कामे पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

पडेगाव येथील प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाची पाहणी करताना आयुक्तांनी बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. ३० सप्टेंबरपर्यंत दोन स्लॅबचे काम पूर्ण करावे आणि मार्चअखेरपर्यंत संपूर्ण बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

तसेच यावेळी तीसगाव येथील PMAY प्रकल्पाचाही आढावा घेण्यात आला. येथेही सप्टेंबरअखेरपर्यंत दोन स्लॅबचे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. प्रकल्पातील लाभार्थी संख्या, किती लाभार्थ्यांनी पहिला हप्ता भरला आहे तसेच प्रत्यक्ष बांधकामाची सद्यस्थिती याबाबत आयुक्तांनी माहिती घेतली. लाभार्थ्यांची प्रक्रिया गतीने पूर्ण करून प्रत्यक्ष बांधकामाला वेग देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

मिटमिटा येथील नवीन शाळा इमारतीची पाहणी करून आवश्यक सुविधांचा आढावा घेण्यात आला. शाळेच्या वीज गरजा लक्षात घेता सौरऊर्जा निर्मिती प्रणालीच्या माध्यमातून निर्माण होणारी ऊर्जा शाळेला जोडण्याची शक्यता तपासावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

डी-मार्टच्या माध्यमातून शाळेसाठी कला वर्ग व प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली. शक्य असल्यास १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम रोजी शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शाळेच्या वेळेनुसार बससेवा सुरू करण्याबाबतही कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. शाळा नवीन इमारतीत स्थलांतरित झाल्यानंतर विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या.

बनेवाडी येथील नवीन शाळा इमारतीची पाहणी करताना सहा नवीन वर्गखोल्या व स्वच्छतागृहांसाठी अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. उ१ इमारतीचे अंदाजपत्रक तयार करून पुढील आठवड्यात सादर करावे, तसेच पुढील १५ दिवसांत प्लिंथ लेव्हलचे काम पूर्ण करावे, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

शाळेच्या समोरील जुन्या काळातली आणि बंद पडलेली पाण्याची टाकी डेब्रिजचा वापर करून भरून जागा समतल करण्याचे निर्देश देण्यात आले. जुन्या पाण्याच्या टाकीच्या इमारतीचा पुनर्वापर करून ग्रंथालय विकसित करण्याची शक्यता तपासण्याचेही निर्देश देण्यात आले.

विटखेडा येथील प्रस्तावित नवीन शाळेच्या जागेची स्थळपाहणी करण्यात आली. नवीन अ‍ नुसार उपलब्ध जागा व परिसराची पाहणी करून शाळेसाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

कांचनवाडी येथील RTS केंद्राच्या शेड उभारणीच्या कामाची पाहणी करून कामाची प्रगती तपासण्यात आली. २ ऑक्टोबरपर्यंत शेडचे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

कांचनवाडी येथील MRF प्रकल्पाचे काम १७ सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे, तसेच पेट क्रिमेटोरियमचे कामही १७ सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

कांचनवाडी येथील प्रस्तावित सहा मजली वर्किंग वुमन हॉस्टेलच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. सदर इमारतीच्या बांधकामाला अपेक्षित प्रतिसाद मिळाल्यास भविष्यात आवश्यकतेनुसार आणखी मजले वाढविण्याबाबत विचार करण्यात येईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच शहानुर मियां चौक परिसरात डी-मार्टजवळ प्रस्तावित पेट्रोल पंपासाठी जागेची स्थळपाहणी करण्यात आली.

चिकलठाणा येथील C&D Waste प्रकल्पाची पाहणी करून कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. प्रकल्प परिसरातील कचऱ्याचे ढीग तातडीने हटवून जागा मोकळी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आठ दिवसांत कचऱ्याचे ढीग हटवून जागा तयार करावी, त्यानंतर बांधकामाचे काम पूर्ण करावे आणि मशिनरीची उभारणी करावी, असे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संपूर्ण प्रकल्पाचे काम १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

चिकलठाणा येथील प्रस्तावित पाच मजली वर्किंग वुमन हॉस्टेलच्या बांधकामाचीही पाहणी करण्यात आली. या प्रकल्पात सुमारे १०० महिलांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येणार असून सध्या पहिल्या स्लॅबचे काम सुरू आहे. कामाची गती वाढवून जानेवारीपर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधितांना दिले. शहरातील विविध विकासकामे नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन निर्धारित कालमर्यादेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यावर महानगरपालिका प्रशासनाचा भर असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. स्थळपाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अमोल कुलकर्णी, उपायुक्त अपर्णा थेटे, उपायुक्त अंकुश पांढरे, घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख नंदकिशोर भोंबे, उपअभियंता पूजा भोगे, स्वप्नाली माने तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# बिडकीनमध्ये चार तास रास्ता रोको; टोलनाका हटवण्यासह तीन प्रमुख मागण्यांसाठी ग्रामस्थांचा तीव्र जनआक्रोश

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर-पैठण रोडवरील बिडकीन येथे उभारण्यात येत असलेला टोलनाका गावातून हटवावा, बिडकीन येथे बायपास करण्यात यावा आणि बिडकीनला महानगर निगम प्राधिकरणातून वगळण्यात यावे, या तीन प्रमुख मागण्यांसाठी मंगळवारी (९ सप्टेंबर) बिडकीन येथे तब्बल चार तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महिलांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विविध पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजीनगर-पैठण रोडवरील बिडकीन येथे टोलनाका उभारण्याचे काम सुरू आहे. हा टोलनाका गावाच्या परिसरातच उभारला जात असल्याने बिडकीनकरांनी त्याला तीव्र विरोध केला आहे. टोलनाका गावात उभारू नये, यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाला यापूर्वी अनेकदा निवेदने देण्यात आली होती. मात्र, टोलनाका उभारणीचे काम सुरूच राहिल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर रास्ता रोको आंदोलन करत टोलनाका गावातून इतरत्र हलवण्याची प्रमुख मागणी करण्यात आली. बिडकीन परिसरात डीएमआयसीमुळे मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू असून, भविष्यात या भागात मोठ्या वाहनांची आणि इतर वाहतुकीची वर्दळ वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे बिडकीन गावातून जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगर-पैठण रोडवर भविष्यात अपघातांची शक्यता वाढू शकते, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली. ही परिस्थिती लक्षात घेता बिडकीन येथे स्वतंत्र बायपास तयार करण्यात यावा, अशीही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी होती.

(पान १ वरुन)

### एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांच्या अंगावर...

बोलावं, मी तुमचा नोकर आहे का? मी महाविकास आघाडीवर सत्तेत असताना त्यांच्या विरोधात बोलत होतो. तुम्ही जिथे सत्ता असेल तिकडेच जाणार आहात. तुम्ही एकनाथ शिंदेंना सोडून भाजपमध्ये जाणार, या सर्वांनी ठरवले आहे. ते थोड्या दिवसात फडणवीसांकडे दिसणार. हेच उद्या बोलतील, फडणवीस साहेबांना बोलू नका, एकनाथ शिंदेबद्दल बोला, असे म्हणत जरांगे पाटलांनी प्रताप सरनाईक यांच्यावर पलटवार केला.

हसत गोळ्या अंगावर घेतल्या नाही तर रावसाहेब जरांगेंची औलाद सांगणार नाही, अशा शब्दात जरांगे पाटलांनी प्रताप सरनाईक यांच्यावर हल्लाबोल केला. अंडरवर्ल्डमध्ये होतो म्हणून गुंडगिरीच्या जीवावर भीती घालू नका, एक कोटी, दोन कोटींचे दिवस गेले. आता, ५ हजारात पोर ठ्याव ठ्याव करतात, असे म्हणत जरांगे पाटलांनी प्रताप सरनाईक यांच्यावर पलटवार केला.

सरपट नाईक आहे तो, आम्ही सुद्धा उपोषण करून कदरलो.. आता संयम सोडा, आम्ही पाहतोच. ते दिघे साहेब, बाळासाहेबांच्या काळातील सांगत आहेत. पण अंडरवर्ल्डचे दिवस गेले. यांनी बैठकीत ठरवले आहे, त्यांना चेंगरूण टाकू. सरनाईकने संयम सोडवा, मुंबईत गुंड जमा करायला त्याला सोप आहे. पण, गोपीनाथ मुंडे साहेबांनी आणि आर.आर. आबांनी अँडरवर्ड संपवले, राहिलेले आम्ही संपवू, अशा शब्दात जरांगे पाटलांनी प्रताप सरनाईकांवर हल्लाबोल केला.

### 'महाभूमी स्टॅक' ॲपवर मिळणार...

क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. सरकारी आणि खाजगी जमिनींचा जुना इतिहास, सध्याची स्थिती, मोजणीचा तपशील आणि रेडी रेकनरनुसार जमिनीचे व्हॅल्युएशन ही सर्व माहिती ॲपवर उपलब्ध असेल. यामुळे राज्यातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना आता तलाठी, तहसीलदार किंवा भूमी अभिलेख कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाहीत.

राज्यातील दीड ते दोन लाख आदिवासी शेतकरी असे आहेत जे वर्षानुवर्षे जमीन कसत आहेत, परंतु त्यांच्याकडे जमिनीचा मालकी हक्क (प्रॉपर्टी कार्ड/सातबारा) नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार, अशा सर्व आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्टे देण्यासाठी विशेष सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात आली आहे.

### कोरडा दुष्काळ जाहीर करा,...

त्यांनी केला. ''कारखानदारांनी उसाचा हंगाम वेळेवरच सुरू करावा जेणेकरून रिकव्हरी चांगली मिळेल आणि ऊस उत्पादकांना किमान ५,००० रुपये प्रति टन दर मिळावा,'' अशी मागणीही त्यांनी केली. शेतकरी प्रश्नांवर बच्चू कडू यांना सोबत घेणार का? या प्रश्नावर उत्तर देताना तुपकर म्हणाले, ''बच्चू भाऊ आता सत्तेत आहेत, त्यामुळे त्यांना आंदोलनात सहभागी होण्यावर काही मर्यादा आहेत.'' अमरावती येथून सुरू झालेले हे डेरा आंदोलन आता संपूर्ण विदर्भ आणि मराठवाड्यात पसरणार असून, आगामी काळात सरकारला शेतकऱ्यांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागण्याची चिन्हे आहेत.

### अमरावती रुग्णालयातील ३ बालकांच्या...

गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. या प्रकरणी कामकाजातील हलगर्जीपणा, बेजबाबदार वर्तन, पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटी आणि अक्षम्य दुर्लक्ष यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ नुसार शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांवरही प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून सार्वजनिक बांधकाम विभागातील दुर्घटनेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतही निर्देश देण्यात आले आहेत.

### पुण्यात एमपीएससीची तयारी करणाऱ्या...

घेतलेल्या टोकाच्या निर्णयामुळे स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील विद्यार्थ्यांकडून पेपरफुटीवरुन तीव्र संताप व्यक्त होत आहे. तर, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनीही सरकारवर हल्लाबोल करत एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

पेपरफुटीच्या प्रश्नावर सरकार जबाबदारी झटकतंय, पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांच्या मोर्चात काँग्रेस पक्ष सक्रीय होता. अध्यक्ष आणि सचिव यांनी राजीनामा द्यावा किंबहुना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनीच भ्रष्टाचार आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर राजीनामा घ्यावा, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केलीय. एमपीएससी अध्यक्षांनी राजीनामा न दिल्यास अध्यक्ष मुख्यमंत्र्यांचे मित्र आहेत आणि त्यांनीच पेपरफुटीसाठी त्यांना नेमले होते असा अर्थ निघेल, असेही सपकाळ यांनी म्हटले. महाराष्ट्र सरकार आंधळं बहिरं आहे, धाराशिवमध्ये एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली, हा सरकारने घेतलेला बळी आहे. त्यामुळे, प्रथमेश यांच्या आत्महत्येस सरकार जबाबदार आहे. प्रथमेशच्या आत्महत्येनंतर तरी आता अध्यक्ष आणि सचिवांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केलीय.

### अनमॅपिंगद्वारे ३ कोटी मतदारांवर अन्याय,...

वाढवावी,'' अशी मागणी त्यांनी केली.

साखर उद्योगाबाबत बोलताना सपकाळ म्हणाले की, ''या फसव्या सरकारने इथेनॉलचे धोरण राबवून उद्योजकांचे खिसे भरले. आता साखरेचा हंगाम सुरू होत असताना भाव कमी करून आणि रिकव्हरीचे निकष लावून ते पुन्हा शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत.''

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I, Neelofer Jehan Do/Fariduddin Sayyed Also known as Syeda Nelofar Jahan D/o Syed Fariduddin (old Names) do hereby solemnly declare that I have changed my name and shall hereafter be known as Neelofar Begum Adil Shaikh (New Name) for all purposes.

**कार्यालय नगर परिषद वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर**
दुरध्वनी क्र. ०२४३६-२२३१४५
E-Mail ID: npvaijapur@gmail.com / coud.vaijapur@maharashtra.gov.in

जा.क्र./न.प.वै/कावि-/२०२६/वसुली विभाग/९९९ दिनांक : ९/८/२०२६

**जाहीर फेरलिलाव सूचना**

वैजापूर नगर परिषद, वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर हद्दीमध्ये असणाऱ्या आठवडी बाजार जमीन भाडे वसुली व दैनिक भाजी मंडई जमीन भाडे फी वसुलीचा जाहीर लिलाव मर्यादित कालावधी १ ऑक्टोबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ करिता दिनांक १६/९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा. श्री फुले - आंबेडकर सभागृह वैजापूर नगर परिषद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तरी गरजुंनी लिलावामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात भाग घ्यावा. लिलावाच्या अटी व शर्ती नियम कार्यालयीन वेळेत (कर विभागात) पहावयास मिळतील.

| स्वाक्षरीत/ - | स्वाक्षरीत/ - | स्वाक्षरीत/ - |
|---|---|---|
| मुख्याधिकारी | उपाध्यक्ष | नगराध्यक्ष |
| वैजापूर नगर परिषद | वैजापूर नगर परिषद | वैजापूर नगर परिषद |